**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९८४/२००७**

**१) श्रीमती नलीनी मधुकर सज्जनवार,**
**रा. महात्मा गांधी वार्ड ता.बल्लारपूर**
**जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपआयुक्त (सामान्य प्रशासन )**
**नगर पालिका प्रशासन नागपूर,**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याधिकारी, नगर परिषद, बल्लारपूर**
**ता. बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ११.२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती हिने दिनांक ११.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ती यांचे तर्फे वकील श्री ए.एस. शेख हे हजर असून त्यांनी बाजू मांडली. उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ती हिने दिनांक १८.४.२००६ रोजी पेंशनचे माहिती पत्र, सर्व्हीस बुक, पेमेंट स्लीप, अंशदायी भविष्य निर्वाह अंतर्गत फार्म प्रत मिळण्याबाबत. माहितीचा कालावधी १९७१ ते १९८१ पर्यंत असा नमूद केलेला दिसून येतो. व माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ४.५.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी आपल्या दिनांक २८.४.२००६ चे माहितीचा अधिकार कायदा, २००५ अन्वये मागीतलेली माहिती फार पूर्वीची असल्यामुळे उपरोक्त रेकार्ड नस्तीबध्द करण्यात आलेला आहे. तसेच या

प्रकरणात आपणास १९८५ पासून अनेकदा माहिती पुरविली आहे. आपण सादर केलेल्या तक्रारी नुसार काही निवडक तक्रारीचे आपण दिलेल्या पत्राच्या छायाप्रती सोबत आपल्या माहिती करीता आपणास पुन्हा देण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरण १९८१ चे असून याबाबत आपणास वेळोवेळी दिलेल्या पत्राच्या झेरॅाक्स प्रती देण्यात येत आहे. व एकुण ४ पत्रांच्या झेरॅाक्स प्रती दिलेल्या दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.७.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलात पुन्हा माहितीच्या अर्जात मागीतलेली माहिती मागीतलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.८.२००६ रोजी दिलेला असून अपीलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे माहितीच्या प्रती पुरविल्या. परंतु, सेवा पुस्ताकाचा शोध घेतला असता उपलब्ध झाले नसल्यामुळे सेवा पुस्तकाची प्रत अर्जदारास पुरविता येणे शक्य होणार नाही असे लेखी दिले व त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढलेले दिसून येत आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी जी माहिती मागीतलेली आहे त्या मागीतलेल्या माहिती प्रमाणे दस्तऐवजाच्या स्वरुपात छायांकित प्रती पुरविलेल्या दिसून येत नाही. परंतु कै. मधुकर सज्जनवार यांचे सेवे संबंधामध्ये जो पूर्वी निर्णय दिलेला आहे त्याबध्दलच्या पत्रव्यवहाराच्या प्रती हया उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. व मागीतलेली माहिती ही जूनी असल्यामुळे व कै. सज्जनवार यांचे प्रकरण नस्तीबध्द झाले असल्याचे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे वकीलानी असा युक्तीवाद केला की, जर पत्र उपलब्ध आहे तर प्रकरण नस्तीबध्द झाले असे कसे म्हणता येईल. कारण हे पत्र त्याच नस्तीमधील असले पाहिजे. व त्यामुळे सर्व्हिस बुक हे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, शोध घेतला असता आढळून आले नाही. परंतु, तसे तोंडी सांगून दिले नाही तर त्याकरीता लेखी पुरावा देणे आवश्यक ठरते. कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये अभिलेखे किंवा दस्तऐवज हे व्यवस्थित ठेवण्याच्या कालमर्यादेचे नियम केलेले असतात. व त्या नियमाप्रमाणे आपण नस्ती ही कोणत्या वर्गवारीमध्ये येते व किती वर्षासाठी सुरक्षित ठेवता येते याबध्दल तरी माहिती उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे किंवा सदरची नस्ती नष्ट केली नसेल तर ती नगर

पालिकेच्या अभिलेख्यामध्ये शोधून उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. नस्ती शोधण्याकरीता सुध्दा ज्या कर्मचा-यांवर शोधण्याची जबाबदारी दिली असेल त्याचे बयाण तरी घेणे आवश्यक असते व तसेही झालेले नाही. त्यामुळे अपीलकर्ती यांनी स्वतःच नगर पालिकेच्या अभिलेख्याची पाहाणी करुन त्यातून सदरची नस्ती मिळाल्यास त्या नस्ती मधून आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांनी किंवा त्यांचे वकीलानी नगरपालिकेच्या कार्यालयातील अभिलेख्यांची पाहाणी करुन सदरची नस्ती उपलब्ध असल्यास त्यातून आवश्यक ती कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांना तारीख व वेळ कळविण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता किंवा त्यांचे वकील यांना नगर पालिकेतील जून्या अभिलेख्यांची पाहाणी करु देण्याकरीता सोबत एका कर्मचा-यांची नियुक्ती करावी व अभिलेख्याच्या मध्ये कै. सज्जनवार यांची नस्ती असल्यास त्यातून अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती उपलब्ध असल्यास त्याची छायांकित प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९८९/२००७**

**१) श्री आनंद रघुनाथ वैरागडे,**
**रा.डॉ.आंबेडकर भवन समोर, कॅालरी रोड,**
**बल्लारपूर, ता. बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपआयुक्त (सामान्य प्रशासन )**
**नगर पालिका प्रशासन नागपूर,**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याधिकारी, नगर परिषद, बल्लारपूर**
**ता. बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ११.२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक ११.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ९.५.२००६ रोजी माहिती अधिका-यांकडे खालीलप्रमाणे माहिती मागण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो. आपल्या कार्यालयाने दिनांक १८.४.२००६ ला मी मागीतलेली माहिती नपब/यो.वी/२१७/२००६ नगर परिषद, बल्लारपूर क्रमांकची मिळाली. १) त्यात प्रश्न क्रमांक ५ प्रमाणे चालता क्रमांक बाबत नझुल विभागा कडून माहिती घेण्यास सुचविले होते. त्याप्रमाणे मी चोकशी पंजी, चालता नंबर व नकाशा घेतलेला आहे. त्याचा चालता नं. १९३ असून ४७.८ चौरस मिटर क्षेत्रफळाची जागा आहे. माझ्या आणि त्याच्या चालता नं. मध्ये तीन फुटाची गल्ली सोडलेली होती. आता तो बांधकाम करुन राहीलेला आहे. त्यात त्याने आपल्या कार्यालयाच्या माहिती प्रमाणे १ फुट ६ इंच जागा सोडलेली आहे. मला जर घर

दुरुस्तीचे काम करावयाचे असल्यास त्या दीड फुटाचे गल्ली मधून मी कसे काय करु शकणार. २) नगर परिषदेने ३ फुटाची गल्ली ऐवजी १ फुट ५ इंचाची गल्ली सोडण्याची त्याला तशी परवानगी दिलेले आहे काय. ३) भविष्यात मला ही जरघराच बांधकाम करावयाचे असल्यास त्याच्या भिंतीला लागून (चिपकून) करण्याचे त्याच्या कडून हमीपत्र (करारनामा) आपणाद्वारे लिहून मिळेल काय ४) दोन घराच्या मध्ये ३ फुटाची गल्ली न सोडता बांधकाम होत आहे ते अवैध नाही काय, अशा अवैध बांधकामावर तातडीने कार्यवाही कां केल्या जात नाही. ५) माहिती प्रश्न क्रं. ६ प्रमाणे १) सध्या दोन घराचे मधात १ फुट ६ इंच जागा सोडलेली आहे. २) याबाबत बांधकाम करणा-या व्यक्ती तर्फे खुलासा मागविण्यात येत आहे. अशा प्रकारची माहिती दिली होती. परंतु मला आजपर्यंत कां देण्यात आलेली नाही. ती देण्यात यावी. ६) पुर्वी मालमत्ता क्रमांक श्रीराम वार्ड १७ च्या बाजूला पूर्व पश्चिम १६ - १७ फुटाचा सार्वजनिक रस्ता होता तो आता १० फुटाचाच राहीलेला आहे. उरलेला ६-७ फुटाचा रस्ता मालमत्ता धारकाला अतिक्रमण करुन बांधकामाची परवानगी लेखी अथवा मौखिक दिलेली आहे काय ७) श्री मो. फारोज सिध्दीकी श्रीराम वार्ड, बल्लारपूर हा सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकाम करुन राहीलेला आहे. सदर बांधकाम हे अतिक्रमीत व अवैध आहे हे स्वयंस्पष्ट असतांना त्यावर तातडीने कार्यवाही न करता आपल्या कार्यालया तर्फे वैळकाढू नितीचा अवलंब केल्या जात आहे याचा अर्थ आपले कार्यालय अवैध बांधकामास प्रोत्साहन देत आहे, हे खरे आहे काय. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २१.७.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक १९.६.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३.८.२००६ रोजी देण्यात आलेला असून माहिती उशिरा प्राप्त झाली अशी तक्रार असल्यामुळे मुख्याधिकारी, नगर परिषद बल्लारपूर यांना ताकीद देण्यात आलेली दिसून येते. सदरचा निर्णय हा अपीलकर्ता यांचे विनंतीप्रमाणे असला तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये अपूर्ण व चुकीची माहिती दिली अशी विनंती नव्हती. मात्र, द्वितीय

अपीलामध्ये अशा प्रकारची विनंती केलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या संबंधात दिनांक २४.७.२००६ रोजी बयाण दिले होते व त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही अशीही तक्रार द्वितीय अपीलात केलेली दिसून येते. व माहिती विलंबाने दिली ही तीसरी तक्रार केलेली आहे.

४. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस लेखी बयाण दाखल केले होते व कार्यवाही केली नाही असे जे त्यांचे म्हणणे आहे त्याबाबत कोणत्या प्रकारचे लेखी बयाण दाखल केले होते ते कागदपत्रात त्यांनी दाखल केले नाही. मात्र दिनांक २७.७.२००६ च्या सुनावणी संबंधात कार्यवाहीची मागणी केली व उपायुक्त नगर पालिका प्रशासन, नागपूर यांनी लेखी बयाणा प्रमाणे कार्यवाही न करता मुख्याधिकारी, नगर परिषद यांना ताकिद देवून प्रकरण निकाली काढले. द्वितीय अपीलाच्या सुनावणी करीता जे लेखी बयाण अपीलकर्ता यांनी दिलेले आहे त्या लेखी बयाणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी जी माहिती मागीतलेली होती त्या माहितीच्या पेक्षा वेगळे मुद्ये उपस्थित करुन चुकीची माहिती दिली आहे असे नमूद केलेले दिसून येते. तसेच अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्याची अपेक्षा त्यातून दिसून येते. परंतु मुळ माहितीच्या अर्जामध्ये अशी कोणत्याही प्रकारची विनंती त्यांची नाही व मागीतलेली माहिती यामध्ये लेखी परवानगी दिली होती काय, किंवा सदरचे बांधकाम अवैध आहे काय. अवैध बांधकामावर तातडीने कार्यवाही कां केली जात नाही, अशा प्रकारचे प्रश्न विचारलेले होते व त्याबाबत दिलेले उत्तर हे योग्य दिसून येते.

५. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे फक्त माहिती उपलब्ध करुन देणे किंवा नाकारणे एवढीच मर्यादित व्याप्ती आहे. कोणत्याही प्रकारची अंतिम कार्यवाही करुन मिळण्याचे, तरतूदीप्रमाणे अपेक्षित नाही. व त्यामुळे अनधिकृत बांधकाम असल्यास अपीलकर्ता यांना संबंधीत कायदयाच्या प्रमाणे सक्षम अधिका-यांकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल. माहिती विलंबाने दिली आहे याबध्दल माहिती अधिकारी यांना विचारले असता अपीलकर्ता यांचे अर्जात व्यक्तीशः माहिती घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे व ते व्यक्तीशः माहिती घेण्यासाठी आलेले नाही, त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. तसेच संबंधीत विभागाकडे अर्ज दिला गेला नव्हता व त्यामुळे विलंबाने दिली असा खुलासा करण्यात आलेला आहे. याबाबत अपीलकर्ता यांना विचारले असता अपीलकर्ता यांनी असे सांगीतले की, ते नगर पालिकेच्या

कार्यालयात ३-४ वेळा गेले होते. त्यांनी माहिती द्या म्हणून सुध्दा मागीतली. परंतु, दुरुत्तरे करुन त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. मात्र याबाबतचा कोणताही लेखी पुरावा त्यांनी सादर केला नाही. त्यावर पुन्हा माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांच्या बरोबर असलेल्या अभियंता यांनी असे सांगीतले की, अपीलकर्ता हे केव्हाही त्यांच्याकडे आलेले नाही. व माहिती व्यक्तीशः घेणार असे दिल्यामुळे ते स्वतः येईपर्यंत माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नव्हते. याबाबतही अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः अर्जात दिल्यानंतर माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता व्यक्त्ीशः जावून माहिती दिली नसल्यास तसे पत्र माहिती अधिकारी यांना देवून त्याबध्दलची पोच घेणे आवश्यक असते.

६. वर म्हटल्या प्रमाणे तशा प्रकारचा पुरावा दिलेला नाही. त्यात अपीलकर्ता म्हणणार ते माहिती देण्यासाठी गेले होते. व माहिती अधिकारी म्हणणार ते मला भेटले नाही. यावर कोणताही निश्चित असा निर्णय देता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती जरी विलंबाने उपलब्ध झाली असली तरी सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व ती मागीतलेल्या प्रमाणे आहे असे दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील हे खरीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९८३/२००७**

**१) श्री मुस्तफा युसुपूभाई बोहरा,**
**द्वारा मोबल हार्डवेअर, अनाज लाईन, वरोरा**
**ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर.**

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याधिकारी, नगर परिषद, वरोरा**
**ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ११.२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक ६.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. परंतु जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी हे विना अनुमती सुनावणीस गैरहजर आहेत. (सुनावणी नंतर मुख्याधिकारी तथा जन माहिती अधिकारी हे उशिराने हजर झाले.)

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.७.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मिळण्यासाठी २ अर्ज केलेले दिसून येतात. - वरोरा येथील नगर परिषदेचे मालकीचे लिजवर दिलेल्या जागेवर नियमानुसार पक्के रस्त्याचे बांधकाम करता येते का व येत असल्यास ते नगर परिषदेचे कोणत्या नियमान्वये करण्यात येते याची माहिती व डोंगरवार चौक, कामगार चौक, नेहरु चौक, गांधी चौक, सावरकर चौक, रेल्वे स्टेशन, स्टेशन फैल, आंबेडकर चौक या भागात लिजचे जागेवर बांधकामाची परवानगी न .प.चे कोणत्या नियमानुसार देण्यात आली तो नियम व ज्या अधिका-यांचे कालावधीत बांधकाम करण्यात आले त्या अधिका-यांचे व इंजिनियर अभियंत्यांचे/कर्मचा-यांचे नांव. गांधी चौकातील शॉपिंग कॅाम्पलेक्स मधील मंजूर नकाशाची सत्यप्रत तसेच सदर कॅाम्पलेक्स मधील मुत्रीघर संडास व जीना मंजूर नसल्याबाबतची व

असल्यास त्याबाबतची माहिती व सदर नकाशा/अभिन्यास तयार करणा-या व त्यास मंजूरी देणा-या अधिका-यांचे, अभियंत्याचे व कर्मचा-यांचे नांव इ. माहिती मागीतलेली आहे.

३. सदरच्या अर्जाच्या प्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.९.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक संचालक, नगर पालिका प्रशासन यांचेकडे न करता राज्य माहिती आयोगाकडे केलेले आहे. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही मागीतलेल्या माहितीच्या प्रमाणे आहे. परंतु अपीलकर्ता यांची विनंती अशी आहे की, सदरच्या अनधिकृत बांधकामा विरुध्द जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही व त्यामुळे सदरची माहिती ही अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे असे त्यांचे म्हणणे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सदरचे बांधकाम हे अनधिकृत असेल तर व त्यांना जन माहिती अधिकारी यांचे उत्तरा प्रमाणे नगर पालिकेनी परवानगी दिली नसल्यास अपीलकर्ता यांनी स्वतंत्रपणे महाराष्ट्र नगरपालिका कायदया प्रमाणे किंवा नगर रचना कायदया प्रमाणे जो अधिकारी सक्षम असेल त्या अधिका-याकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल.

४. वास्तविक माहितीचा अधिकार, २००५ च्या तरतूदी प्रमाणे एक अर्ज, त्याच्या निर्णयाविरुध्द प्रथम अपील व त्या प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील अशी तरतूद आहे. कोणत्याही प्रकारे दोन अर्जांच्या संबंधात एकच प्रथम अपील किंवा एक द्वितीय अपील दाखल करता येत नाही. तसेच प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सुध्दा दाखल केलेले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही विलंबाने उपलब्ध झालेली असली तरी त्याबाबत माहिती अधिकारी यांना समज किंवा ताकीद देणे संयुक्तिक राहील. परंतु

अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारिज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांनी मागीतलेली माहिती ही उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारिज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९८८/२००७**

**१) श्री शामराव काशिराम शिरसाट,**
**मु.पो.शिवणी (गौतम नगर ), अकोला,**
**ता.जिल्हा अकोला.** **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याध्यापिका, जि.प.मराठी प्राथमिक शाळा, शिवणी,**
**ता.जिल्हा अकोला.** **उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक ११.२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१०.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मुख्याध्यापिका,जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा,शिवणी यांचेकडे मागीतली आहे.

शिवणी ग्राम पंचायत सरपंच तथा ग्राम शिक्षण समिती अध्यक्ष उपसरपंच तथा ग्राम शिक्षण समिती उपाध्यक्ष व ग्राम पंचायतीचे सदस्य तथा ग्राम शिक्षण समिती सदस्य व मुख्याध्यापक तथा ग्राम शिक्षण समिती सचिव यांचे दिनांक एक जुलै, ०५ ते आजपर्यंत मासिक सभेच्या हजेरी बुकाची सत्यप्रत मिळावी ही विनंती. तसेच शिवणी ग्राम पंचायतीने माहे जून, जुलै, २०५ ला जो शिक्षण समिती निवडी बाबत ठराव घेऊन आपलेकडे पाठविला त्या ठरावाची सत्यप्रत मिळावी ही विनंती. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३.	सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ११.१०.२००६ रोजी ग्राम शिक्षण समितीच्या मासिक सभेचे हजेरी बुक नसल्यामुळे मी माहिती देवू शकत नाही. मागीतलेली दूसरी माहिती ग्राम पंचायतीने माहे जून, जुलै, २००५ ला जे शिक्षण समिती निवडीबाबत ठराव घेतला त्याची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. त्याशिवाय माहिती १५ ऑक्टोंबर पर्यंत देण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. व सदरची प्रत मिळाली आहे याबध्दलची पोच अपीलकर्ता यांनी दिलेली दिसून येते. सदरच्या निर्णयाच्या विरुध्द प्रथम अपील दाखल करण्याच्या ऐवजी अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक १६.१२.२००६ रोजी आपण अद्याप ग्राम पंचायत शिवणीने शिक्षण समिती निवडीबाबत जो ठराव घेतला त्याची सत्यप्रत अद्याप दिली नाही. कृपया त्या ठरावाची सत्यप्रत द्यावी. अन्यथा ठरावाची सत्यप्रत कां देत नाही किंवा ठरावाची सत्यप्रत देण्यास कां विलंब होत आहे याबाबत लेखी कळवावे. लेखी द्यावे अन्यथा मी आपणा विरुध्द अपील अर्ज करीन याची सर्व जबाबदारी आपलीच राहील. कृपया याची नोंद घ्यावी ही विनंती. करीता पहिले स्मरणपत्र सादर असा अर्ज केल्याचे दिसून येते.

४.	सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २५.११.२००६ रोजी संदर्भाकिंत पत्रानुसार दिनांक १५.११.२००६ ही वेळ दिली होती. परंतु ग्राम शिक्षण समितीने १५ दिवसांची मुदत मागीतल्यामुळे ही माहिती सद्या देवू शकत नाही. तरी सोमवार दिनांक २७.११.२००६ ला ठरावाची प्रत माहिती मिळाली असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर मात्र दिनांक ७.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी शिवणी ग्राम पंचायतीने माहे जून, जुलै, २००५ ला जो ग्राम शिक्षण समिती निवडी बाबत ठराव घेतला त्या ठरावाची सत्य प्रत मिळावी व सौ. हटकरे, मुध्याध्यापिका, जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा,शिवणी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली व करीत आहे म्हणून त्यांचे विरुध्द २,०००/- रुपये दंड व विलंबामुळे रुपये २५०/- रोज प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करावी ही विनंती. परंतु सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेला दिसून येत नाही. व त्यामुळे पुन्हा पुन्हा अर्जदार हे माहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापिका यांचेकडे अर्ज करताना दिसत आहे.

५.	माहितीच्या अधिकाराचा अर्ज केला असताना सुध्दा आमरण उपोषण करीन याची सर्व जबाबदारी आपली राहील अशीही तक्रार शासकिय माहिती अधिकारी यांचेकडे केल्याचे दिसून

येते. तरी सुध्दा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्ता यांच्या सर्व पत्रांचे उत्तर दिलेले दिसून येतात. पुन्हा दिनांक २१.१२.२००६ रोजी गट विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्याही प्रथम अपीलाचा निर्णय गट विकास अधिकारी यांनी केलेला दिसून येत नाही. दिनांक २६.१२.२००६ ला मुख्याध्यापिका यांनी ग्राम सेवक/सचिव यांचेकडे उपरोक्त विषयान्वये आपणास विनंती करण्यात येत आहे की, जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा, शिवणी येथील ग्राम शिक्षण समिती निवडीच्या ठरावाची प्रत त्वरीत देण्याची कृपा करावी. कारण या ठरावाची प्रत श्री शिरसाट यांनी दिनांक १०.१०.२००६ च्या माहितीच्या अधिकारात मागीतलेली आहे. या अर्जाची प्रत सुध्दा अपीलकर्ता यांना त्यांच्या स्वाक्षरी वरुन दिलेली दिसून येते. पुन्हा दिनांक ९.१.२००७ रोजी माहिती अधिकारी यांनी मासिक सभेचे हजेरी बुक संबंधात शिक्षण समिती निवडीबाबतच्या ठरावाच्या संदर्भात ग्राम पंचायतीने ठरावाची प्रत देण्यास नकार दिला असे अपीलकर्तायांना कळविलेले दिसते.पुन्हा दिनांक ११.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु त्याही प्रथम अपीलाचा निर्णय गट विकास अधिकारी यांनी दिलेला दिसून येत नाही. व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

६. अपीलकर्ता यांच्या दिनांक ११.१०.२००६ च्या माहितीच्या अर्जास दिनांक ११.१०.२००६ रोजीच उत्तर दिलेले असल्यामुळे माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेले आहे हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. वास्तविक ग्राम शिक्षण समिती स्थापन करण्याचा ठराव हा ग्राम पंचायत करते व त्यामुळे सदरच्या माहिती करीता ग्राम पंचायत हे सार्वजनिक प्राधिकरण आहे व त्या ग्राम पंचायत मध्ये त्या ठरावाची प्रत ही उपलब्ध होऊ शकते किंवा ग्रामपंचायतीच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत घेवून त्याबध्दलची खात्री करुन घेता येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे त्यानंतर जे माहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापिका यांना लिहिलेले पत्र आहे व त्या पत्रांची भाषा बघितल्यास निव्वळ वेठीस धरण्याच्या दृष्टीने हा सर्व पत्रव्यवहार झालेला दिसून येतो. प्रत्येक विषयाच्या माहिती करीता ते ते सार्वजनिक प्राधिकरण हे जबाबदार असते. त्यामुळे ग्राम पंचायत हे सार्वजनिक प्राधिकरण स्वतंत्र आहे तसेच जिल्हा परिषदेच्या मराठी प्राथमिक शाळा हे सार्वजनिक प्राधिकरण स्वतंत्र आहे. व त्यामुळे एका स्वतंत्र प्राधिकरणाकडे दूस-या

प्राधिकरणाची माहिती मागणे हे मुळातच अव्यापा-याशी व्यापार आहे किंवा उलटा घास घेण्याची प्रक्रिया आहे व त्यातच माहिती मागण्याचा उद्येश कळतो.

७. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये गट विकास अधिकारी यांनी वेळीच प्रथम अपीलाचा निर्णय घ्यावयास पाहिजे होता. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. व तसे आयोगापुढे सुध्दा सादर केलेले दिसून येत नाही. सर्व पत्रव्यवहार हा माहिती अधिकारी यांचे बरोबर झालेला दिसून येतो. त्यामुळे कदाचित गट विकास अधिकारी यांना अधिनियमाच्या तरतूदींचे कोणत्याही प्रकारचे ज्ञान दिसत नाही,असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदरच्या संबंधीत गट विकास अधिकारी यांना माहितीच्या अधिकाराचे प्रशिक्षणा करीता पाठविणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी तथा उच्च श्रेणी मुख्याध्यापक,जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा,शिवणी यांनी मागीतलेल्या माहितीच्या करीता माहिती अधिकारी नसताना सुध्दा त्यांनी अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले दिसून येते. व त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या करीता प्रयत्न सुध्दा केलेले दिसून येतात व त्याप्रमाणे माहिती सुध्दा अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

३)अपीलकर्ता व उत्तरवादीयांना निर्णयाची एक प्रतदेण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९९१/२००७**

**१) श्री डॉ. रविंद्र टी. बोरकर,**
**रा. डी-१२४/४ उर्जानगर, चंद्रपूर**
**ता.जिल्हा चंद्रपूर -४४२४०२** **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**कुलगुरु, कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापिठ,**
**रामटेक, ता. रामटेक, जिल्हा नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**कुलसचिव , कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापिठ,**
**रामटेक, ता. रामटेक, जिल्हा नागपूर.**

**उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १३.२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव , कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापिठ, रामटेक, ता. रामटेक, जिल्हा नागपूर हे हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कागदपत्रे दाखल झाली आहे.

२. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मोमो मध्ये सहाय्यक माहिती अधिकारी, कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापिठ, रामटेक यांनी दिनांक ७.१२.२००६ रोजी मुळ अर्ज हस्तपोच स्विकारला नाही. २) माहिती देण्यापूर्वीच रुपये १००/- आकारणी व अवाजवी कमीशन वर खर्च करण्यास भाग पाडणे. ३) मराठी भाषेतील मुळ अर्ज न स्विकारणे ही कारणे देवून द्वितीय अपील दाखल केलेलेआहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००६ रोजी सहाय्यक माहिती अधिकारी, कवी कुलगुरु कालादास संस्कृत विद्यापिठ, रामटेक यांचेकडे (डेप्युटी रजिष्ट्रार) उपसचिव पदाच्या निवडी नियुक्ती बाबत. माहितीचा कालावधी १८.८.२००६ ते आतापर्यंत. आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन -१) दिनांक ६.११.२००६ रोजी (डेप्युटी रजिस्ट्रार) उपकुलसचिव, पदासाठी मुलाखत घेतलेल्या सर्व उमेदरांची नांवे, शैक्षणिक अर्हता, वेतन श्रेणी सह अनुभव, इ.माहिती (स्टेटमेंट) (२) (डेप्युटी रजिस्ट्रार) पदासाठी निवड समिती सदस्यांच्या नांवाची पदनामासह यादी ३) निवड समितीतील मागासवर्गीय सदस्यांचे नांव, पदनाम, कार्यालयाचे नांव. माहिती व्यक्तीशः आवश्यक आहे व त्याकरीता व त्याकरीता मोबाईल नंबर दिलेला आहे किंवा डाकद्वारे बोलवावे असे लेखी दिल्याचे दिसून येते. अर्जाचे वर हस्त देय असेही नमुद केले आहे.

४. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २१ फेब्रुवारी, २००६ चे कुलसचिव यांनी निर्गमित केलेले परिपत्रकाची प्रत कार्यालयात हस्तपोच पध्दतीने देण्यात आली. सदरच्या परिपत्रकामध्ये, "सर्वांना सूचित करण्यात येते की, विश्व विद्यालयाच्या निर्णयानुसार यापूढे विश्व विद्यालयाचे कार्यालयात हस्तपोच पध्दतीने सादर केलेला कुठलाही खाजगी पत्रव्यवहार स्विकारल्या जाणार नाही. खाजगी पत्रव्यवहार हा फक्त टपालाद्वारेच स्विकारल्या जाईल. संलग्नीत महाविद्यालयाचा पत्रव्यवहार किंवा दस्तऐवज मात्र विश्वविद्यालयाच्या कार्यालयातील आवक विभागात पूर्वी प्रमाणेच टपालाने किंवा हस्तपोच पध्दतीने स्वीकारणे सुरु राहील." सदरच्या परिपत्रकातील सूचना हया अपीलकर्त्याला मान्य नसल्यामुळे त्यांनी दिनांक १३.१२.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील वर दिलेल्या कारणास्तव केलेले दिसून येते. व सदरच्या प्रथम अपीलाच्या पाठीमागील पृष्ठावर विद्यापीठातील केलेले नियम हे मुद्रीत केलेले दिसून येतात.

५. अपीलकर्ता यांनी रुपये १०/- चे इंडियन पोस्टल आर्डर व रुपये २०/- ची इंडीयन पोस्टल आर्डरची छायांकित प्रत जोडलेली दिसून येते. त्याचप्रमाणे रुपये १००/- चा डिमांड ड्राफ्ट सुध्दा काढलेला दिसून येते. त्याकरीता रुपये १०० + ३० = १३० रुपयाची पावती जोडलेली दिसून येते. परंतु, सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक

२०.१२.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलातील अपीलकर्ता यांचे मुद्दे अमान्य केलेले दिसून येते.

६. अपीलकर्ता यांनी त्यांचे द्वितीय अपीलामध्ये जे मुद्दे उपस्थित केलले आहे त्यापैकी -

**मुद्दा क्रमांक १** :- मराठी भाषेतील मुळ अर्ज न स्विकारणे. याकरीता अधिनियमाच्या कलम ६ (१) मध्ये या अधिनियमान्वये कोणतीही माहिती मिळविण्याची इच्छा असलेल्या व्यक्ती, त्याने किंवा तिने मागणी केलेल्या माहितीचा तपशिल विनिर्दिष्ट करणारी, इंग्रजीमधील किंवा हिंदीमधील अथवा अर्ज ज्या क्षेत्रात करणा-त येत असेल त्या क्षेत्राच्या राजभाषेमधील लेखी स्वरुपात केलेली किंवा इलेक्टॉनिक साधनाद्वारे केलेली विनंती, विहित करण्यात येईल, अशा फिसह-

(क) संबधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या केंद्रीय जन माहिती अधिका-यांकडे किंवा यथास्थिती राज्य जन माहिती अधिका-यांकडे; (ख) केंद्रीय साहाय्यक जन माहिती अधिका-यांकडे किंवा यथास्थिती राज्य साहाय्यक जन माहिती अधिका-यांकडे; सादर करील: परंतु, जेव्हा अशी विनंती लेखी स्वरुपात करता येऊ शकत नसेल अशा बाबतीत यथास्थिति केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी, मौखिक विनंती करणा-या व्यक्तीस, ती लेखी स्वरुपात आणण्यासाठी योग्य ते सर्व साहाय्य करील. अशा प्रकारची तरतूद असल्यामुळे व महाराष्ट्र शासनाची राजभाषा ही मराठी असल्यामुळे, मराठी भाषेतील कोणताही अर्ज न स्विकारण्याचे स्वातंत्र्य हे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणास नाही. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगीतले की, मराठी भाषेत अर्ज स्विकारत नाही असे त्यांनी कोणत्याही उत्तरात म्हटलेले नाही. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, विहित नमून्यात अर्ज करावा असे सांगीतले व विद्यापीठाच्या विहित नियमातील अर्ज हे इंग्रजी भाषेत आहे.

**मुद्दा क्रमांक २** :- हस्त देय मुळ अर्ज न स्विकारणे. याबाबत पून्हः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी हया स्पष्ट आहे. वर नमूद केलेल्या अधिनियमाचे कलम ६ (१) मधील **माहिती मिळविण्याकरीता विनंती** याबध्दलच्या तरतूदींचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी किंवा सहाय्यक जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करील अशा प्रकारची तरतूद आहे. परंतु, तो कोणत्या पध्दतीने सादर करावा याबध्दलची

तरतूद नाही. मात्र ज्याअर्थी, परंतुका मध्ये माहिती अधिकारी यांनी मौखिक विनंती करणा-या व्यक्तीस ती लेखी स्वरुपात आणण्यासाठी योग्य ते सहाय्य करील असे दिलेले आहे, त्याअर्थी, तो हस्तदेय पध्दतीने सुध्दा स्विकारणे अभिप्रेत आहे. व त्यामुळे हस्त देय पध्दतीने स्विकारता येणार नाही असे सार्वजनिक प्राधिकरणास म्हणता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) प्रमाणे माहिती मिळविण्यासाठी केलेला अर्ज यापूढे मात्र विद्यापिठाकडे अपवाद करणे संयुक्तिक राहील.

**मुद्या क्रमांक ३** :- च्या संदर्भामध्ये माहिती देण्यापूर्वीच अवाजवी रुपये १००/- आकारणे व अवाजवी कमीशनवर खर्च करण्यास भाग पाडणे. यासंदर्भा मध्ये अधिनियमाचे कलम ७ (३) प्रमाणे माहिती देण्याचा खर्च दर्शविणारी कोणतीही जाद फी प्रदान केल्यावर माहिती देण्याचा निर्णय घेण्यात आला असेल त्याबाबतीत, जन माहिती अधिकारी, विनंती करणा-या व्यक्तीस- (क) पोट कलम (१) अन्वये विहित केलेल्या फीनुसार ही जादा रक्कम त्यांनी कशाच्या आधारे ठरवली त्या हिशोबासह, माहिती पुरविण्याचा त्याने निर्धारित केलेला खर्च दर्शविणारा जादा फीचा तपशिल नमूद करणारी सूचना पाठवील व त्याद्वारे तिला ती फी भरण्याची विनंती करील. अशा प्रकारची तरतूद केलेली असून अधिनियमाचे कलम २७ (२) चे पोटकलम (ग) प्रमाणे कलम ७ चे पोटकलम (१) व (५) अन्वये देय असलेली फी च्या संबंधात सुध्दा शासनाला या अधिनियमाच्या तरतूदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येईल अशा प्रकारची तरतूद आहे. व सदरच्या नियमाच्या संबंधामध्ये महाराष्ट्र शासनाने दिनांक ११.१०.२००५ रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ हे केलेले असून त्या कलम ४ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता फी बध्दल तरतूद करण्यात आलेली आहे. व त्याप्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने माहितीच्या खर्चाच्या करीता फी आकारणे आवश्यक आहे.

७. विद्यपीठ ही जरी स्वायत्त संस्था असली तरी सुध्दा विद्यापीठास किंवा स्वायत्त संस्थेस कोणत्याही प्रकारचे नियम करण्याची शक्ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे नाही. अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे सक्षम प्राधिकरणास स्वतंत्रपणे नियम करण्याची तरतूद कलम २८ मध्ये दिलेली असली तरी सक्षम प्राधिकरणाच्या व्याख्येमध्ये विद्यापीठ येत

नाही व त्यामुळे विद्यापीठास स्वतंत्र असे कोणतेही नियम माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतूदीची अंमलबजावणी करीता करता येत नाहीत.

८. महाराष्ट्र शासनाच्या माहितीचा अधिकार नियम, २००५ च्या कलम ४ प्रमाणे वर नमूद केल्याप्रमाणे- Fee for information १) For froviding the information under sub-section (१) of section ७, the fee shall be charged by way of cash against proper receipt or by demand draft or bankers cheque payable or by way of money order to the public authority, at the following rates, namely:

| | |
|---|---|
| (A) (a) When the concerned Department has Already fixed the price of some Documents, maps, etc. | The price so fixed plus postal charges |
| (b) When the information is readily available Either by way of photocopying, or by Other way (copy) | i) rupees two for each page (in A-४ or A-५ size paper) created or copied plus postal charges; or<br>ii) actual charges or cost price of a copy in large size paper plus postal charges. |

B) For inspection of records, no fee for the first hour; and a fee of rupees five for each fifteen minutes (or fraction thereof) thereafter:

Provided that no postal charges shall be charged if the applicant collects the information personally.

२) For providing the information under sub-section (५) of section ७, the fee shall be charged by way of cash against proper receipt or by demand draft or bankers cheque or by way of money order payable to the public authority at the following rates :-

a) for information provided in diskette or floppy, rupees fifty per diskette or floppy plus Postal charges; and

b) for information provided in printed form at the price fixed for such publication or rupees two per page of photocopy for extracts from the publication plus Postal charges:

Provided that no postal charges shall be charged if the applicant collects the information personally.

९.     यावरुन असे दिसून येते की, माहिती मिळण्यासाठीच्या अर्जाचे शुल्क याबाबत १०/- रुपये कोर्ट फीस स्टॅम्पच्या माध्यमातून अर्ज स्विकारल्यास सदरचा कोर्ट फीस स्टॅम्पची रक्कम ही शासनाकडे जमा होईल व स्वायत्त संस्थेस मात्र त्याबाबतचा खर्च हा सोसावा लागेल. त्याबाबत सार्वजनिक प्राधिकरणास नियम ३ प्रमाणे जे पर्याय दिलेले आहे त्या पर्याया पैकी एक पर्यायाचा उपयोग करुन अर्ज स्विकारता येईल असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. तसेच नियम ५ प्रमाणे सुध्दा अपीलाच्या संदर्भामध्ये तशा प्रकारचा पर्याय हा सार्वजनिक प्राधिकरणास वापरता येतील. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, डिमांड ड्राफ्ट किंवा बँकर्स चेक किंवा मनी ऑर्डरच्या माध्यमातून खर्च करावयाचा झाला तर त्यास कमीशन द्यावे लागते व तो अधिकचा खर्च हा अर्जदारास करावा लागतो. मात्र याबाबत महाराष्ट्र शासनाचे वर नमूद केलेले हे नियम आहे. त्या नियमांमध्ये दिलेल्या पर्यायाप्रमाणेच जादा खर्चाची आकारणी करावयाची असल्यामुळे याबाबत मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे मान्य करता येत नाही. तसेच नियम ७ (१) प्रमाणे विनंतीचा अर्ज निकालात काढतांना वर नमूद केलेल्या नियम ७(३) प्रमाणे माहिती देण्याचा खर्च दर्शविणारी कोणतीही जादा फी प्रदान केल्यावर माहिती देण्याचा निर्णय करण्यात आला असेल त्याबाबतीत, जादा रक्कम त्याने कशाच्या आधारे ठरविली, त्या हिशोबासह माहिती पुरविण्याचा त्याने निर्धारित केलेला खर्च दर्शविणारा जादा फीचा तपशिल नमूद करणारी सूचना पाठवील व त्याद्वारे तीला ती फी भरण्याची विनंती करील याचा अर्थ असा आहे की, सार्वजनिक प्राधिकरणाने मागीतलेल्या माहितीच्या संबंधामध्ये माहितीची निश्चिती झाल्यानंतर त्या माहितीच्या अंदाजानुसार खर्चाचा हिशोब कळवायचा आहे. व त्यामुळे माहितीच्या अर्जाच्या सोबत अनामत म्हणून डिमांड ड्राफ्टच्या माध्यमातून रुपये १००/- ची आकारणी करणे हे संयुक्तिक नाही. व त्यामुळे विद्यापीठाने केलेले त्या संबंधातील जे नियम आहे ते या अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे नाही असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. अपीलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीचा अंदाज घेतल्यानंतरच त्याबध्दलचा खर्च कळविणे संयुक्तिक आहे व त्याकरीता कलम ७ (३) मध्ये जन माहिती अधिकारी यांनी जादा फी भरण्याची विनंती केल्यावर व फी चे प्रदान केल्याच्या दरम्यानचा कालावधी हा त्या पोटकलम मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ३० दिवसांच्या कालावधीची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ वगळण्यात येईल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

१०. यावरुन जोपर्यंत अर्जदार माहिती देण्यासाठीचा खर्च दर्शविणा-या कोणत्याही जादा फीचा भरणा करीत नाही तो पर्यंत माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता दिसून येत नाही. व त्यामुळे विद्यापीठाने केलेले नियम हे अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे दिसून येत नाही. परंतु, याबाबत सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता खर्च केल्यास व अर्जदाराने मात्र खर्चाचा भरणा न केल्यास सार्वजनिक प्राधिकरणास त्या खर्चाचा भूर्दंड सोसावा लागतो व त्याकरीता खर्च भरणा केल्या नंतरच छायांकित प्रती तयार करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र, त्याबाबत सुध्दा अर्जदारास कळविणे हे संयुक्तिक राहील.

वरील विवेचना नुसार अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

१) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे माहिती मिळण्यासाठीचा अर्ज हा इंग्रजी किंवा हिंदी किंवा अर्ज ज्या क्षेत्रात करण्यात येत असेल त्या क्षेत्राच्या राजभाषेतील लेखी स्वरुपात स्विकारणे बंधनकारक राहील.

२) अर्जदाराचा कलम ६(१) प्रमाणे अर्ज हा हस्त देय स्विकारणे आवश्यक असल्याने विद्यापीठाने दिनांक २१.२.२००६ च्या परिपत्रकांमध्ये योग्य ती सुधारणा करावी.

३) अर्जदाराच्या माहिती मिळण्यासाठीच्या अर्जाबरोबर माहितीचा जादा खर्च अनामत म्हणून रुपये १००/- माहिती देण्यापूर्वीच आकारणे हे नियमाप्रमाणे नसून उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या माहितीच्या खर्चाची निश्चिती केल्यानंतरच व तो खर्च कशाच्या आधारे ठरविला आहे त्या हिशोबासह अधिनियमाचे कलम ७(३) प्रमाणे कळविणे बंधनकारक असल्यामुळे विद्यापीठाने केलेले नियम हे मागे घेण्यात यावे.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १३.२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९९२/२००७**

**१) श्री नामदेव गुलाबराव अतकर,**
**मु. आलोडा (बोरगांव) पो.वायगांव (निपानी)**
**ता. देवळी, जिल्हा वर्धा. अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**तहसिलदार, तहसिल कार्यालय, देवळी**
**ता. देवळी, जिल्हा वर्धा.**

**३) जन माहिती अधिकारी**
**तहसिल कार्यालय, देवळी. जिल्हा वर्धा. उत्तरवादी.**

**( आदेश पारित दिनांक १३.२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार हे हजर होते परंतु सुनावणीचे वेळी निघुन गेले.

२. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमो मध्ये मौजा आलोडा (बोरगांव) येथील शेत सर्व्हे नंबर ६२ व ६३, शेत सर्व्हे नंबर ६२ हा अखंड पीस ६ हेक्टर ३७ आर असून त्यामधील १ हेक्टर ५१ आर हा हीस्सा विक्री द्वारे विकलेला आहे. १ हेक्टर ३५ आर नामदेव गुलाबराव अतकर मृत्यूपत्राद्वारे परंतु उर्व्ररित ३ हेक्टर ५१ ही शेत जमीन गणपत बालाजी (पाटील) बोळबुधे यांचे नांवे कशाच्या आधारावर करण्यात आले या संबंधातून माहिती मागीतली परंतु मिळालेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी आढळली. परंतु या संपुर्ण माहितीचा उल्लेख अर्जदाराच्या माहिती मिळण्यासाठीच्या दिनांक १२.७.२००६ च्या अर्जामध्ये स्पष्टपणे दिसून येत

नाही. सदरच्या अर्जामध्ये १) आधी हे शेत क्रमांक ६२ व ६३ हे कोणाच्या नांवावर होते. २) ही शेती आता कोणाच्या नांवावर आहे. ३) या शेतीचे आवश्यक असलेले कागदपत्रे मला द्यावी. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. माहितीचा कालावधी १९४८ ते २००६ दिलेला दिसून येतो.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.७.२००६ रोजी तहसिलदार, देवळी यांनी तलाठी, आलोडा (बोरगांव) मार्फत मंडळ अधिकारी, गिरोली यांना आपण माहितीचे माहिती अधिकारी असल्यामुळे सदर माहिती सोबतचे अर्जात मागविल्यानुसार संबंधीत अर्जदारास देण्यात येवून तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास उलट टपाली सादर करावा, असे कळविण्यात आल्याचे दिसून येते व प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते.

४. त्याप्रमाणे तलाठी यांनी "तलाठी रेकार्डला सदरची माहिती अभिलेख जीर्ण असल्यामुळे नोंदी दिसू शकत नाहीत करीता प्रमाणपत्र सादर " असे प्रमाणपत्र दिलेले दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक २१.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संबंधामध्ये अपील प्रकरणी मंडळ अधिकारी, गिरोली हे अपीलीय अधिकारी असल्यामुळे त्यांचेकडे पाठविण्यात आलेले दिसून येत आहे. तरी त्यांच्याशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी. असे अपीलकर्ता यांना दिनांक १२.९.२००६ रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, देवळी येथे माहिती मागीतली असल्यामुळे माहिती अधिकारी तहसिलदार, देवळी कार्यालय यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती. परंतु, तसे न करता सदरचा अर्ज हा तलाठी यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून पाठविण्यात आलेला दिसतो. त्यामुळे तत्कालीन तहसिल कार्यालयातील माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. तलाठी यांचेकडील कागदपत्रे ही जीर्ण झालेली आहेत असे त्यांनी प्रमाणपत्र दिलेले असल्यामुळे त्यांच्याकडे सदरची माहिती

उपलब्ध होऊ शकत नाही असे दिसून येते. प्रथम अपीलात सुध्दा तहसिलदार यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय हा न देता पुन्हा मंडळ अधिकारी यांचेकडे प्रथम अपील हे हस्तांतर केलेले दिसून येते. व त्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होऊ शकत नाही असे दिसते.

५. तहसिलदार यांचा समज असा दिसतो की, त्यांच्यकडे आलेले अर्ज किंवा अपीले हे हस्तांतर करावयाचे असतात. यावरुन तहसिलदार यांनी आपली जबाबदारी टाळली आहे असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे निर्णया विरुध्द त्याच कार्यालयातील किंवा त्याच क्षेत्रातील वरिष्ठ अधिका-याकडे प्रथम अपील दाखल करण्याच्या तरतूदीचा उद्येश असा आहे की, त्याच स्तरावर अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणे. परंतु, सदरच्या प्रकरणी तहसिलदार यांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने कोणत्याही प्रकारचे अधिनियमातील तरतूदीचे पालन केलेले दिसून येत नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतूदींचे उल्लंघन केलेले दिसून येते. तहसिलदार यांना प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून व तहसिलदार कार्यालयातील तत्कालीन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकारी म्हणून ताकीद देणे आवश्यक आहे.

६. असे असेले तरी अपीलकर्ता यांना त्यांनी मागीतलेली माहिती उपलब्ध झाल्यास माहिती देणे हा अधिनियमाचा उद्येश सफल होईल, असे दिसते. मात्र अपीलकर्ता यांनी सुध्दा दिनांक १२.७.२००६ च्या अर्जामध्ये माहितीचे विवरण दिले आहे ते मोघम असल्यामुळे तहसिलदार व माहिती अधिकारी यांनी सदरच्या अर्जाच्या संबंधामध्ये टाळाटाळ केल्याचे दिसून येते. माहितीचे विवरण हे अतिशय काटेखोर व स्पष्ट असणे आवश्यक आहे जेणेकरुन माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देणे शक्य होईल. अन्यथा या प्रकरणात ज्या प्रमाणे अर्ज व अपीलाची टोलवा टोलव झाली आहे त्याप्रमाणे अनुभव येऊ शकतो. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती

उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे व त्याकरीता त्यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १२.७.२००६ च्या व द्वितीय अपील मेमो मध्ये केलेल्या स्पष्टीकरणाकरीता आलोडा येथील गट क्रमांक ६२ व ६३ च्या संबंधात फेरफार संबंधी जे अभिलेखे उपलब्ध असतील त्या अभिलेख्यांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात. व १९८१पूर्वी सदरच्या शेत जमीनीच्या फेरफार संबंधीचे अभिलेखे हे अपीलकर्ता यांनी स्वतंत्रपणे वर्धा येथील तहसिलदार कार्यालयात अर्ज करुन उपलब्ध करुन घ्याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १३.२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १११/२००७**

**१) श्री अविनाश चौरसिया,**
**रा.मोदी नं.२, सिताबर्डी,**
**नागपूर इ ४४००१२.** **तक्रारदार**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी**
**उपजिल्हाधिकारी (निवडणुक) तथा सेतू**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.** **गैरतक्रारदार.**

**( आदेश पारित दिनांक १४.२.२००८ )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक नसलेले परंतु राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दिनांक २०.७.२००७ रोजी प्राप्त झालेली तक्रार ही प्रथम अपील क्रमांक २५/२००७ मधील आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अंतर्गत दाखल करण्यात आलेली दिसून येते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री अविनाश कानडे, उपजिल्हाधिकारी, नागपूर हजर आहे.

२. सदरच्या तक्रारीमध्ये अनेक माहिती अधिकारी नियुक्त करण्याविषयी, मागीतलेल्या माहितीच्या अनुषंगाने रुपये ७४९/- भरण्याच्या संबंधात, माहिती अधिकारी हे निश्चित कागदपत्रे किती हे सांगत नाही, अशी तक्रार करणे, नको ती कागदपत्रे देणे, माहिती अधिकारी हे लिपिकाला त्रुटी पुर्तता करण्यासाठी सांगतात. इ. अशा अनेक कारणा वरुन तक्रार दाखल केलेली दिसून येते. सदरच्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ११.९.२००७ रोजी उपजिल्हाधिकारी (निवडणुक) तथा माहिती अधिकारी (सेतू) यांनी खुलासा दाखल केलेला दिसून येतो. सदरच्या

खुलाशाप्रमाणे तक्रारदार यांनी दिनांक ९.३.२००७ रोजी माहितीचा अर्ज माहिती अधिकारी (सेतू) यांचेकडे दाखल केला होता. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ५ एप्रिल, २००७ रोजी रुपये ७४९/- माहितीचा खर्च भरावयास सांगीतले असे दिसून येते. सदरचा खर्च रुपये १०००/- दिनांक २ ऑगष्ट, २००७ रोजी अपीलकर्ता यांनी भरलेला असेही दिसून येते व रजिस्टर पोस्टाने दिनांक २२.८.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. दिनांक २५.६.२००७ च्या आदेशाप्रमाणे अर्जदारास अभिलेख्याची पाहाणी करण्याकरीता आदेश दिले होते. त्याप्रमाणे सर्व अभिलेखे अपीलकर्ता यांना दाखविण्यात आलेले होते व त्यावर त्यांनी नोट व कामेंट सुध्दा तसे करता येत नसले तरी लिहिलेले आहे, असे आयोगाच्या सुध्दा निदर्शनास आणलेले होते, तसेच ज्या ज्या नस्ती अर्जदाराने मागीतल्या त्या त्या त्यांना पाहाण्यासाठी दिलेल्या आहेत. त्यातही अर्जदाराचे समाधान झालेले नसल्यास त्यांनी मागीतल्याप्रमाणे पुन्हा नस्ती दाखविता येतील, तसेच अर्जदार रोज कार्यालयात येतात हे अर्जदाराचे म्हणणे बरोबर नसून अर्जदार हे रोज कार्यालयात येत नाही. माहिती करीता खर्च भरल्याशिवाय त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येत ाही व त्यामुळे त्यांनी वेगवेगळे आरोप केल्याचे दिसते. उलट त्यांना पाहाण्यास दिलेल्या नस्तीवर परवानगी नसतांना नोंदी केलेल्या दिसून येतात. अर्जदार हे असभ्य भाषा बोलतात. असभ्यपणे वागतात व अर्ज हा अधिका-यांच्या व कर्मचा-यांच्या समोर फेकतात व "मी स्वतंत्र देशाचा स्वतंत्र माणूस आहे" असे म्हणून "माझा अर्ज स्विकारलाच पाहिजे व तुम्हाला माहिती दिलीच पाहिजे" अशा प्रकारे वर्तणा बध्दल खुलासा केलेला आहे. व त्याकरीता महिला जावक लिपिक यांची तक्रार सोबत पुरावा म्हणून दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी अनेक माहिती अधिकारी नियुक्त करण्याच्या बध्दल आक्षेप घेतलेला आहे. त्याबध्दल तो शासन निर्णय असल्यामुळे त्यावर कोणत्याही प्रकारे भाष्य करता येत नाही.

३. एकुणच, या संपुर्ण खुलाशा वरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याकरीता सोबत दिलेला पुरावा पाहिल्यास माहिती अधिकारी यांच्या खुलाशातील सत्यता दिसून येते. असे असले तरी तक्रारदाराच्या वर्तनाबध्दल माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी तोंडी असे सांगीतले की, अपीलकर्ता यांनी कॉम्पूटर

प्रोजेक्ट सेतू संबंधात टेंडर भरले होते. सदरच्या टेंडर सोबत इ.एम.डी.(Earnest Money Deposit) भरलेले नव्हते व टेंडर मध्ये रेट कोट (नमूद केले) केले नव्हते. सदरची टेंडर निविदा प्रक्रिया ही रद्य करण्यात आलेली असून न्यायालयात प्रकरण प्रलंबीत आहे व त्यामुळे अपीलकर्ता हे कार्यालयात येवून माहिती अधिकारी व इतर अधिका-यांना व कर्मचा-यांना असभ्य भाषा बोलून असभ्य वर्तन करतात असे दिसून येते. तसेच त्यांना संपूर्ण नस्त्या दाखवून माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे सदरच्या तक्रारीत तथ्य नसल्याचे दिसून येते व सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) तक्रारदार यांना दिनांक २२.८.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व इतर त्यांच्या मुद्यांमध्ये कोणतेही तथ्य आढळून येत नसल्यामुळे ( व उलट महिला कर्मचा-यांशी सुध्दा ते असभ्य भाषेत बोलत असल्यामुळे व तशी तक्रार महिला कर्मचा-यांनी दिलेली असल्यामुळे ) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येत आहे.

१) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १४.२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील -**

**अपील क्रमांक ५०५/२००७**

**१) श्री गोविंद रामचंद्र जयसिंगपूरे,**
**रा.चांदूर रेल्वे, वार्ड नं. १७ घर नं.९७**
**माळीपूरा, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उप आयुक्त (सामान्य प्रशासन )**
**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याधिकारी, नगर परिषद चांदूर रेल्वे,**
**ता. चांदूर रेल्वे, जिल्हा अमरावती.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १४.२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२००६ रोजी लक्ष्मण कचधने यांनी दिलेले मे. तहसिलदार साहेब यांचे वारसाचे प्रमाण पत्र व मय्यत दाखला अन्य कागद पत्र मिळणे बाबत राज्य जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद कार्यालय, चांदूर रेल्वे यांचेकडे करुन स्वतः माहिती घेणार असे नमूद करुन माहिती मागीतलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्रमांक १९९/नपचारे/फेरफार-बी/२००६, दिनांक ४.११.२००६ अन्वये नमूद केलेली माहिती (कचधने यांचे वारसान प्रमाणपत्र व मय्यत दाखला) हे यापूर्वीच दिनांक २७.९.२००६ रोजी या कार्यालयाकडून पुरविण्यात आले आहे

// २ //

असे कळविणारे पत्र पाठविले असता पत्र घेण्यास नकार दिला. दिनांक २७.९.२००६ रोजी देण्यात आलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे दिनांक ३.८.३००६ च्या अजानुसार घराचे फेरफार संबंधी असलेली कागदपत्रांच्या प्रती मागीतल्या होत्या. तीच माहिती पुन्हा दिनांक ३०.१०.२००६ चे माहितीचे अधिकार अधिनियम अंतर्गत मागण्यात आली होती असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००६ रोजी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.१.२००७ रोजी देण्यात आला असून सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक २५.१.२००७ नुसार मय्यत दाखला पुरविण्यात आला व दिनांक २५.१.२००७ अन्वये श्री कचधने यांचे वारसाने प्रमाणपत्र पुरविण्यासाठी पत्र दिले असता ते घेण्यासाठी नकार दिला असे दिसून येते व त्याविरुध्द अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दाखल केलेले आहे.

४. माहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल करताना वरीलप्रमाणे खुलासा केलेला असून अर्जदार श्री जयसिंगपूरे यांनी पुन्हा दिनांक २९.८.२००७ अन्वये घराच्या फेरफार संबंधीची वरील प्रमाणे माहितीची मागणी केली. त्यानुसार दिनांक २७.९.२००६ रोजी पुरविलेल्या माहिती नुसार पुन्हा श्री लक्ष्मण कचधने यांचे मालमत्ता फेरफारचा दिनांक ७.४.२००३ चा अर्ज दिनांक १३.३.२००३ चे तहसिलदार चांदूर रेल्वे यांनी दिलेले वारसान प्रमाणपत्र, श्री पांडुरंग बालाजी चौकडे यांचे दिनांक २०.१२.२००२ चे मृत्यू प्रमाणपत्र, श्री लक्ष्मण किसन कचधने यांना दिनांक २८.४.२००३ रोजी आलेली नोटीस इत्यादी प्रती दिनांक १४.९.४००७ रोजी देण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर सुध्दा या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४०९/नपचारे/मुख्य/२००७, दिनांक २५.९.२००७ अन्वये श्री लक्ष्मण किसन कचधने यांचे तहसिलदार, चांदूर रेल्वे यांनी दिलेले वारसान प्रमाणपत्र व भागीरथी पांडूरंग चौकडे यांचे दिनांक २०.१२.२००२ चे मय्यम प्रमाणपत्राच्या प्रती देण्यासंबंधाने पत्र दिले असता डाग घेण्यास नाकारले त्यामुळे सदरची माहिती नोंदणीकृत डाकेने पाठविली. नोंदणीकृत डाकेची पोचपावतीवर अपीलकर्ता यांची डाक मिळाल्याची पोच आहे. दिनांक २६.९.२००७ चे पत्राचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांचे

दिनांक ३०.१०.२००६, ४.११.२००७, २५.१.२००७, २५.१.२००७ व १४.९.२००७ असे पत्र दिलेले दिसून येतात. व त्यामध्ये मागीतलेल्या माहिती बध्दल संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सहपत्र सुध्दा दिलेले दिसून येतात. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी पूर्वी दिनांक ३.८.२००६ रोजी सुध्दा माहिती मागीतलेली होती व त्यावेळेस ती पुरविण्यात आली होती असे कळविणारे पत्र पाठविले असता घेण्यास नकार दिला. यावरुन व नंतर केलेल्या अर्जावरुन अपीलकर्ता यांचा माहिती न घेण्याचा उद्येश दिसून येत नाही. पूर्वी जर ती माहिती उपलब्ध करुन दिली असेल व पुन्हा तीच माहिती मागीतली असेल तर त्यासंबंधामध्ये संदर्भ देवून कळविलेले असल्यास माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली असा निष्कर्ष काढता येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी वेळोवेळी त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली आहे परंतु त्यांनी ती घेण्यास नकार दिलेला असल्यामुळे व त्यानंतरही रजिस्टर पोस्टाने त्यांना मिळाली असून त्याबध्दलची पोच दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना दिनांक २७.९.२००६ रोजी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली हे दिनांक ४.११.२००६ रोजी विहित मुदतीत कळविलेले असल्यामुळे व त्यानंतर सुध्दा त्यांच्या वेळोवेळीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असून त्यांनी घेण्याचे नाकारलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १४.२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक ८६/२००७**

**१) श्री हगरु राघो कापगते,
रा.पो. सेंदूरवाफा, ता.साकोलाी,
जिल्हा भंडारा. तक्रारदार**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा**
**१) सचिव, ग्रा.पं.सेंदूरवाफा, ता.साकोली, जि. भंडारा**
**२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. भंडारा. गैरतक्रारदार.**

**( आदेश पारित दिनांक १५.२.२००८ )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक १७.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार हजर आहे. माहिती अधिकारी यांचे तर्फे अधीक्षक श्री एल.एम. बावणे हजर आहे. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत उशिरा आले. तसा अर्ज त्यांनी आयोगाचे कार्यालयात (वेळ १६.००) दिला.

२. तक्रारदार यांनी दिनांक २४.४.२००६ रोजीच्या ग्राम पंचायत कार्यालय सेंदूरवाफा येथील श्री लंजे, ग्राम विकास अधिकारी सेंदूरवाफा येथील १ ते १० मुद्यांवर माहिती मागीतली होती. १० मुद्यांवर माहिती खोटी पुरविल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून ग्राम विकास अधिकारी यांचेवर कारवाई करावी, कारण त्यांनी खोटी माहिती पुरविली होती. त्याकरीता दिनांक ११.६.२००६, ३.७.२००६ व ११.६.२००६ रोजी श्री लंजे, ग्राम विकास अधिकारी यांचेवर कारवाई करण्यास्तव लेखी अर्ज दिला. त्यानंतर दिनांक ३.१०.२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये पुन्हा अर्ज दिला. परंतु वरील बाबतीत अजूनपर्यंत काहीही उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा कडून मिळाले नाही. व

त्यामुळे गैर अर्जदारावर कायदेशिर कारवाई करण्यास्तव तक्रार अर्ज सविनय सादर केलेला दिसून येतो.

३. तक्रारदार यांनी तक्रारीत म्हटल्याप्रमाणे दिनांक २४.४.२००६ रोजी ग्राम विकास अधिकारी, सेंदूरवाफा यांचेकडे केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे अर्जाची प्रत उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे सदरच्या अर्जाप्रमाणे तक्रारदार यांच्या म्हणण्याप्रमाणे जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तराची प्रत सुध्दा दाखल केलेली नाही. मात्र पुन्हा दिनांक १६.६.२००६ रोजी ग्राम विकास अधिकारी व सरपंच यांनी अर्जदारास दिलेली माहिती खरी व वस्तुस्थितीच्या आधारे दिलेली आहे याकरीता पुन्हा उत्तर दिलेले दिसून येते. मात्र सदरच्या उत्तराचे अनुषंगाने तक्रारदार यांनी प्रथम अपील करावयास पाहिजे होते. ते प्रथम अपील दाखल न करता पुन्हा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून माहिती मागण्याकरीता अर्ज दाखल केलेला दिसून येतो. त्यात मौजा सेंदूरवाफा, तालुका साकोली जिल्हा भंडारा येथील सचिव, श्री लंजे, ग्राम विकास अधिकारी, विचारलेल्या माहितीच्या आधारे खोटी माहिती दिल्याचे तक्रारी बाबत काय कार्यवाही झाली, अशी विचारणा केल्याचे दिसून येते. तसेच दिनांक ३.७.२००६ रोजी दिलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही झाली अशी विचारणा करुन माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

४. तक्रारदार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे जी माहिती मागीतलेली आहे त्या माहितीच्या संबंधामध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रे किंवा पुरावा माहिती खोटी आहे याकरीता दाखल केलेला दिसून येत नाही. तसेच दिनांक ३.७.२००६ चा अर्जाचे अवलोकन केले असता त्यातही माहिती खोटी आहे या पलीकडे काहीही दिसून येत नाही. व त्यामुळे जिल्हा परिषदे कडून तक्रारदार यांना कोणती अपेक्षा आहे हे जरी दिसत असले तरी अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे प्रथम अपील करावयास पाहिजे असते व त्याप्रमाणे त्याची कार्यवाही होत असते. प्रथम अपील मात्र केलेले दिसून येत नाही. व त्यामुळे जिल्हा परिषद माहिती अधिकारी यांचेकडूनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही. राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा तक्रार करताना मुळ माहितीचा अर्ज दाखल केला नाही. त्यावरची

मुळ उत्तर दाखल केले नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाने कोणत्या प्रकारची कार्यवाही करावी व कोणाच्या विरुध्द कार्यवाही करावी हेही दिसून येत नाही. जोपर्यंत माहितीच्या अधिकाराचा अर्ज केलेला आहेव त्यातूनच माहिती मिळाली आहे हे सिध्द होत नाही तोपर्यंत कोणत्याही प्रकारे कार्यवाही राज्य माहिती आयोगास करता येत नाही व त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) तक्रारदार यांनी मुळ मार्हितीचा अधिकाराचा अर्ज व त्यावरील त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दिलेले उत्तर हे दाखल केलेले नसल्यामुळे तसेच प्रथम अपील सुध्दा जिल्हा परिषद यांचेकडे दाखल केलेले नसल्यामुळे सदरची तक्रार ही खरीज करण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक ८९/२००७**

**१) श्री अभिमन्यू गणेश सुरकार**
**(सेवानिवृत्त उ.श्रे.मुख्याध्यापक मौदा),**
**प्रगती नगर प्लॉट नं.२३, डॉक्टर कॉलनी जवळ,**
**पो. भगवाननगर, नागपूर.** **तक्रारदार**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**गटाशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मौदा,**
**जिल्हा नागपूर.** **गैरतक्रारदार.**

**( आदेश पारित दिनांक १५.२.२००८ )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक २३.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक ११८/२००७ मधील राज्य माहिती आयोगाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबध्दल तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहे.

२. तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक ११८/२००७ हे दाखल केले होते. सदरच्या अपीलाचा निर्णय दिनांक १४.६.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ५.७.२००६ रोजीच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जाप्रमाणे माहिती देण्यात यावी असा आदेश देण्यात आलेला होता. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या मुळ मागणीच्या संदर्भामध्ये दिनांक २७.६.२००७ रोजी त्यांना गट शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांनी दिनांक १७.७.२००७ च्या उत्तराप्रमाणे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु, दिनांक १७.७.२००६ चे उत्तर तक्रारदार यांनी दाखल

केलेले दिसून येत नाही. मात्र दिनांक १७.७.२००६ च्या पत्राचा उल्लेख हा दिनांक २७.६.२००७ च्या पत्रामध्ये दिसून येतो, व त्यातही अपीलकर्ता यांच्या मुळ माहितीच्या मागणीच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली आहे त्याबध्दलची संपूर्ण माहिती दिलेली दिसून येते. त्यानंतरही तक्रारदार यांचे असे म्हणणे आहे की, सदर पत्रात मागीतलेली माहिती मात्र देण्यात आलेली नाही, असे म्हटलेले आहे. सदरच्या अर्जाचे अवलोकन केले असता त्यात पूर्ण माहिती जरी देण्यात आलेली नाही असे दिसते, तरीसुध्दा अर्जदाराच्या मुळ मागणीच्या बध्दल वर नमूद केल्याप्रमाणे विवेचन केलेले दिसून येते.

३. त्यानंतर पुन्हा दिनांक ६.२.२००७ रोजी तक्रारदार यांना त्यांचे दिनांक ५.७.२००६ च्या माहितीच्या अर्जामधील दिनांक २५.३.२००६ च्या अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली त्याबध्दलचे तारखेनुसार विवेचन देण्यात आलेले आहे व त्यामुळे तक्रारदार यांना त्यांच्या दिनांक ५.७.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) तक्रारदार यांना त्यांच्या दिनांक ५.७.२००६ च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दिनांक १७.७.२००६, २७.७.२००६ व दिनांक ६.२.२००७ नुसार माहिती उपलब्धकरुन देण्यात आलेली असल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १५.२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९९८/२००७**

**१) श्री अशोक गोपाळराव ब्रम्हपूरीकर,**
**रा.भानापेठ वार्ड, राम मंदीरचे बाजूला,**
**चंद्रपूर, ता.जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उप सचिव, जलसंपदा विभाग(राकसे)**
**मंत्रालय, मुंबई -३२.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**अवर सचिव, जलसंपदा विभाग(राकसे)**
**मंत्रालय, मुंबई -३२.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १६.२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.६.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा अवर सचिव, जलसंपदा विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतल्याचे दिसून येते-

" जलसंपदा विभागात ८२ ते ८४ चे क.अ. यांना शा.अ.पदावर नेमणुकी पूर्वी १.४.९०, ९१, ९२ देण्यांत आले. नंतर दिनांक १.४.८९ देण्यांत आल्याचे प्रकरणसंबंधात जलसंपदा विभागाच्या ८२ ते ८४ चे क.अ.ना पूर्वी शा.अ. पदे १.४.९०, ९१, ९२ असे देवून नंतर सुधारित दिनांक १.४.८९ देण्यांत आले या प्रकरणाबाबत. माहितीशी संबंधीत कालावधी :-शा.अ.पदावर मूळ नेमणूकीचे दिनांका पासून ते सुधारित दिनांक १.४.८९ देण्यांत आलेल्या कालावधी पर्यंतची व दस्तावेजची सत्यप्रत माहिती द्यावी. आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन- खालील माहिती देण्यांत यावी.

१) सन ८२ ते ८४ मधील क.अ. हयांना शा.अ. नेमणूकीचे दिनांक १.४.९०,९१,९२ देण्यांत आले आहे, त्यांची यादी देण्यांत यावी.

२) सन ८२ ते ८४ मधील क.अ. यांना दिनांक १.४.९०, ९१,९२ पासून शा.अ. नेमणूकीचे देण्यांत आलेल्या शासन आदेशाची प्रत देण्यात यावी.

३) ८२ ते ८४ मधील क.अ. यांना १.४.९०, ९१,९२ ऐवजी शा.अ. नेमणूकीचे सुधारीत दिनांक १.४.८९ देण्यांत आलेल्या शासन आदेशाची प्रत देण्यांत यावी.

४) ८२ ते ८४ मधील क.अ. हयांनी शा.अ. पदावर १.४.९० ,९१,९२ ऐवजी दिनांक १.४.८९ मिळणेसाठी केलेल्या सर्व अर्जाची प्रत देण्यांत यावी.

५) ८२ ते ८४ मधील क.अ. जे शा.अ. करीता १.४.८९ ला पात्र होते त्यांची सन ८५-८६, ८६-८७, ८७-८८ हया वर्षातील केलेल्या अनुकूल/प्रतिकूल कामाबाबत माहिती देण्यात यावी.

६) सन ८५-८६ ते ८७-८८ पर्यंतच्या कालावधीचे प्रतिकूल कामाविषयी त्यांना कळविले असल्यास त्याची माहिती देण्यात यावी.

७) सन ८५ ते ८८ पर्यंतच्या प्रतिकूल कामाविषयी कळविलेल्या पत्रावर संबंधिताने केलेल्या अर्जाची व शासनाने पुर्नविचार केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी.

८) सन ८२ ते ८४ च्या क.अ. हयांना दिनांक १.४.८९ ऐवजी उशिराने १.४.९०, ९१,९२ शा.अ. देण्यामागील कारणांची माहिती देण्यांत यावी.

९) सन ८२ ते ८४ च्या क.अ.यांना शा.अ.पदावर सुधारित आदेश दिनांक १.४.८९ देण्यामागील शासन निर्णयाची/परिपत्रकाची प्रत देण्यांत यावी. "

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २१.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून यते.

४. अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात दिनांक ३.८.२००६ रोजी खालीलप्रमाणे कळविण्यात आल्याचे दिसून येते.

" आपण, जलसंपदा विभागात सन ८२-८३ व ८४ मध्ये कार्यरत असलेले कनिष्ठ अभियंताना दिनांक १.४.९०, १.४.९१ व १.४.९२ पासून शाखा अभियंता पदावर नेमणूक दिल्याबाबतच्या व हया शाखा अभियंताना दिनांक १.४.८९ पासून फेर सुधारित नेमणूक दिल्याबाबतच्या आदेशाच्या प्रती तसेच, सदर शाखा अभियंता हे दिनांक १.४.८९ रोजी पात्र असून त्यांना उशिराने दर्जा देण्यामागील कारणे इत्यादि माहिती आपल्या दिनांक २६.६.२००६ च्या पत्राद्वारे मागविलेली आहे.

कनिष्ठ अभियंत्यांना शाखा अभियंता पदावरील दर्जोन्नती देण्याबाबतचे विभागाकडे प्राप्त होणारे प्रस्ताव व त्याची तपशिलवार तपासणी करुन स्वतंत्र धारिकेतून सादर करुन मग संबंधित कनिष्ठ अभियंताना शाखा अभियंताची दर्जोन्नती दिली जाते. अशाीच कार्यवाही पुनर्विचारार्थ प्राप्त प्रस्तावावर केली जाते.

आपण मागविलेली माहिती व तसंबंधीचे आदेश उपलब्ध करण्यासाठी आतापर्यंत कार्यवाही केलेल्या सर्व धारिकांचा शोध घेऊन त्या बारकाईने तपासाव्या लागतील. शाखा अभियंताची संवर्ग संख्या (पूर्वी १०००० व आता ५५००) फारच मोठी असून प्रत्येकास दर्जोन्नती कधी, केव्हा व कशाच्या आधारे दिली याबाबतची एकुण एक माहिती संकलीत करण्याच्या कामास मोठया प्रमाणात मनुष्यबळ व शासनाची साधनसामग्री वापरावी लागेल. तसेच कित्येक कामाचे तास यावर खर्ची पाडावे लागतील.

अशाप्रकारे प्रचंड मेहनतीने, मनुष्यबळ नियमित कामापासून वळवून तयार केलेल्या या माहितीचा उपयोग या विभागास वा कोणतेही व्यापक लोकहित साधले जाण्यास होणार आहे, असे दिसून येत नाही. या उलट प्रशासकिय व विकास कामाच्या अंमलबजावणीमध्ये अधिका-यांना द्यावा लागणारा वेळ व शक्ती अनावश्यकरित्या हया कामात खर्ची पडेल.

सबब, यासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, माहितीच्या अधिकारांतर्गत माहिती ज्या स्वरुपात ठेवली जाते त्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कलम २(i) तथापि, आपण मागितलेली माहिती पुरविण्यासाठी वरीलप्रमाणे शासनाची साधन सामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे. तसेच ही माहिती प्रकट केल्याने व्यापक लोकहित साधले जाणार आहे

असेही दिसून येत नाही. त्यामुळे आपण मागितलेली माहिती आपणास कलम ८ (१)(इ व (जे) अंतर्गत देता येणे शक्य नाही. " असे कळविलेले दिसून येते.

४. त्यानंतर प्रथम अपीलाच्या संबंधात सुध्दा दिनांक ७.९.२००६ रोजी, दिनांक ३.८.२००६ च्या पत्रान्वये उत्तर पाठविले आहे ते कायम केलेले दिसून येत आहे. त्यावर दिनांक ४.१०.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्जाचा संदर्भ देवून " व्यापक लोक हिताच्या दृष्टीने माहिती मागविण्यात आली होती, परंतु ३० दिवसात कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आली नाही. व दिनांक ३.८.२००६ च्या पत्रान्वये माहिती देता येणे शक्य नाही असे कळवून एवढी सोपी माहिती देण्यास नाकारण्यात आलेले आहे. वास्तविकता अशी आहे की, सन १९८२-८३ च्या कालावधीतील नेमणुक झालेल्या कनिष्ठ अभियंत्याची संख्या अंदाजे ५०० च्या जवळपास असावी व यापैकी ५ ते ६ टक्के अभियंत्यांना शाखा अभियंता पदावर नेमणुक उशिराने देण्यात आलेली आहे व यापैकी काही अभियंत्यांना नंतर दिनांक १.४.१९८९ ही मानीव दिनांक देण्यात आली. अशांची संख्या अंदाजे २५-३० प्रकरणे असावे. तरी उपरोक्त माहिती एकदम सोपी असताना सुध्दा नाकारण्यात आली आहे. म्हणजेच यामागे फार मोठी गडबड झाल्याचे दिसून येत आहे. तसेच या कामासाठी कोणत्याही प्रकारचे प्रचंड मेहनती मनुष्यबळाची आवश्यकता नाही. सत्य माहिती तातडीने उपलब्ध करुन देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. तरी विनंती आहे की, मागीतलेली माहिती तातडीने देण्यात यावी."

५. वरील सर्व माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मागीतलेली माहिती ही निश्चितच जूनी आहे. व ९ मुद्यांचा विचार केल्यास ती अतिशय व्यापक प्रमाणात आहे. संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता त्या कालावधीतील संपुर्ण नस्त्यांची पाहाणी करुन त्यातून ती माहिती काढून तयार करुन द्यावी लागेल. यावरुनच माहितीच्या संबंधामध्ये जे उत्तर दिनांक ३.८.२००६ रोजी देण्यात आलेले आहे ते योग्य दिसून येते. व ही बाब दिनांक ४.१०.२००६ चे अपीलकर्ता यांचे पत्रावरुन स्पष्ट होते. अपीलकर्ता यांनी त्यांच्या पत्रात म्हटल्याप्रमाणे सन १९८२-८४ या कालावधीत नेमणुक झालेल्या कनिष्ठ अभियंत्यांची संख्या अंदाजे ५०० च्या जवळपास असावी. म्हणजेच अपीलकर्ता यांचा हा फक्त अंदाज आहे. त्यांना निश्चित माहिती नाही. तसेच ५ ते ६ टक्के अभियंत्यांना शाखा अभियंता पदावर नेमणुक उशिरा देण्यात आलेली

आहे व यापैकी काही अभियंत्यांना नंतर दिनांक १.४.१९८९ मानीव दिनांक देण्यात आले अशांची संख्या अंदाजे २५-३० प्रकरणे असावीत. म्हणजेच यातही अपीलकर्तायांना निश्चित माहिती नाही. थोडक्यात संपुर्ण माहिती ही मोघम मागीतली आहे. व सन १९८२-८४ या कालावधीत फार मोठी गडबड झाल्याचे दिसून येत आहे असे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे व्यापक लोकहिताच्या निकषावर माहिती त्यांनी मागीतलेली दिसून येते. परंतु, ३०-३५ वर्षाच्या कालावधी नंतर शासकीय सेवेत पदोन्नती किंवा मानीव दिनांक तपासणेसाठी माहिती मागणे हयात कोणतेही सार्वजनिक व्यापक हित नाही. ज्या कर्मचा-यांवर अन्याय झाला असे वाटल्यास त्यास प्रशासकिय न्यायाधिकरणकडे दाद मागता येणे व त्यातही वाजवी मुदत असते. आता तसा प्रयत्न करुनही न्यायालयात दाद मागणे मुदतबाहय होऊ शकते. व त्याकरीता वेळीच तक्रार करणे आवश्यक असते. त्यामुळे व्यापक हित काय?, असा प्रश्न उपस्थित होणे साहजिक आहे.

६. तसेच माहिती नाकारण्यात आली आहे. म्हणजेच फार मोठी गडबड झाल्याचे दिसून येत आहे, असे नमूद केलेले दिसून येते. माहिती अधिकारी हे आज ज्या पदावर आहेत त्यापूर्वी १९८२-८४ या कालावधीमध्ये ते सेवेत होते किंवा नाही किंवा त्याच कार्यालयात होते किंवा नाही याचा विचार जर केला तर १९८२-८४ च्या कालावधीत जी गडबड झाली आहे अशी अपीलकर्ता यांची माहिती आहे, त्याकरीता माहिती अधिकारी कारणीभूत आहे काय याचाही विचार करावा लागेल. जर माहिती अधिकारी या गडबडीस कारणीभूत नसतील त्यांना भितीचे कारण नाही व माहिती नाकारण्याचे काहीही कारण नाही, हा निष्कर्ष काढणेस हरकत नाही. माहिती नाकारण्याचे कारण दिनांक २.८.२००६ च्या पत्रात दिले आहे. त्यामुळे मोघम माहिती मागीतल्यास तशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागते व ही बाब अधिनियमाचे कलम ७ पोटकलम (९) मध्ये सुध्दा देण्यात आली आहे. व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी दिलेले जे कारण आहे ते संयुक्तिक दिसून येते.

७. असे असले तरी अपीलकर्ता यांनी मागीतलेी माहिती जरी व्यापक असली तरी त्यांना अपेक्षीत असलेली माहिती जर त्यांना ती माहिती उपलब्ध करुन घेण्याचे दृष्टीने अपीलकर्ता यांनी त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीच्या संबंधामध्ये सार्वजनिक प्राधिकरणा मध्ये जे अभिलेखे

उपलब्ध असतील त्या अभिलेख्याची पाहाणी करुन त्यातून आवश्यक त्या अभिलेख्यांचे छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. अधिनियमाच्या कलम २ मध्ये "**माहितीचा अधिकार**" या संज्ञेची व्याख्या देण्यात आली आहे. त्या व्याख्येमध्ये "माहितीचा अधिकार" याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळविण्याजोगी माहिती मागविण्याचा अधिकार असा आहे व त्यात- १) एखाद्ये काम, दस्तऐवज, अभिलेखे याची पाहाणी करणे ,
२) दस्तऐवजाची किंवा अभिलेख्यांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे अशी तरतूद असल्यामुळे अपीलकर्ता यांनी वर म्हटल्याप्रमाणे पाहाणी करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीचे निश्चित विवरण माहिती अधिकारी यांना कळवून संबंधीत अभिलेख्यातून संबंधीत नस्तीची पाहाणी करुन त्यातून छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात.

२) अपीलकर्ता यांनी संबंधीत अभिलेख्यातील नस्तीचे पाहाणी करण्याकरीता व छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्याकरीता माहिती अधिकारी यांना तारीख व वेळ हा कळविण्यात यावा.

३) अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ च्या कलम ४(१)(b) प्रमाणे अभिलेख्यांची पाहाणी करण्याकरीता जे शुल्क विहित केलेले आहे ते शुल्क भरावे. व त्यानंतर ज्या छायांकित प्रती उपलब्ध होतील त्याकरीता नियम ४(१)(A)(b) प्रमाणे छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.२.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १००२/२००७**

**१) श्री लिलाधरराव रामाजी ऊर्फ रामचंद्र ढोले,**
**रा.संत तुकाराम वार्ड नं.१८ (नवीन २१)**
**मीरा प्रोव्हीजन समोर, रामनगर वर्धा, ता.जि.वर्धा.**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, वर्धा.**
**ता.जिल्हा वर्धा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, वर्धा**
**ता.जिल्हा वर्धा.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १६.२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

**माहितीचा विषय** - वेणुबाई रामाजी ढोले (आई मय्यत) भाडेपटटेदार प्लॉट क्रं. ४८५ यात भूखंउ ४३३७ व भूखंक ४३३६ बंदोबस्तीची कॉपी नकाशे. १९५४ ते २६.५.२००५ दोन भाग पाडणे ते चुकीचे क्षेत्रफळ. प्लॉट क्रमांक ४८५- ५५ x२३= १२६५ स्के.फुट यांचे भूखंड ४३३७, ४३३८ करण्याबाबतचे सर्व दस्तऐवज १९५४ ते १९७१ पर्यंतचे आलेख, नकाशे, लेख, जी.आर. त्या त्या अधिका-याचं शेरे टिपणासह वरील माझ्या व्यतिरिक्त व नात्या व्यतिरिक्त कोणीही नाही.

**माहितीच्या अधिकारा अंतर्गत-**

**विषय १** :- नगरपरिषदेचा मुळ भाडेपटटेदार वेणुबाई रामाजी ढोले पलॅाट क्रं. ४८५ ज्याची चर्तुसीमा पूर्वेस प्लॅाट क्रं. ४८४ पच्छीमेस- रोड, उत्तरेस - नगर परिषद गल्ली, दक्षिणेस - ३० फुट रोड, ५५ फुट X२३ फुट =१२६५ चौरस फुट आहे. सीट क्रमांक ६२ मध्ये भुखंड ४३३७ व ४३३८ भूखंड आहे हे निर्मीती केव्हा झाली. त्यापूर्वीचा बंदीबस्तीची कॅापी नकाशात माहिती अधिकारान्वये २६.५.२००५ ला मागणी केली कुठल्याही प्रकारची माहिती दिली नाही.

**प्रश्न २ रा** :- भुखंड ४३३८ मध्ये १९ X २३ असे वेणुबाई रामाजी ढोले यांचे टिनाचे घर हाते. त्या जागेबाबत यापूर्वी आपले कार्यालयाने भूमापन करण्यास आलेल्या कर्मचा-यास व अधिका-यास १९६५ पासून सर्व लेख दाखवून ही सदर जी जागा आणि क्षेत्रफळ वादातीत नावाने लिहून ठेवली करीता माहिती अधिकारान्वये १९५४ ते १९७० पयंतचे नकाशे, आखीव पत्रीका, बंदोबस्ताची कॅापी नकाशे मागीतले आणि कोणत्या अधिका-याने माझे आईची मालमत्ता दूस-या नांवे केली त्याकरीता त्यांचा शे-यांसह टिपणासह शाषण जी.आर.ची कॅापी पाहिजे.

**प्रश्न क्रं**. ३ रा :- भुखंड ४३३७ तसेच भुखंड ४३३८ मध्ये ४३३७ च्या मालकीचा संडास ५X५ त्याला जाण्याकरीता दक्षीण X उत्तर २१/२ फुट रुंदीची गल्ली स्वयंपाक खोलीच्या दरवाजा पासून संडासपर्यंत अशा गल्लीचा उल्लेख का करण्यात आली नाही. मु. गल्ली कडून ४३३७ चे मालकीची ४ फुट रुंदीची गल्ली व भुखंड क्रमांक ४३३६ विहिरी वरील पाणी भरण्याचा ही असलेली जागा या दोन्ही जागेचा मालकी हक्क ४३३७ चा असताना सर्व लेखाद्वारे प्रत्यक्ष भेटीत दाखवूनही सर्व लेख दुर्लक्षीत करुन वादनिर्मी करुन ठेवला आहे.

**प्रश्न ४ था** :- ५५ X २३ सदर प्लॅाट मधून ह्व पलॅाट ६३२ १/२ फुट आणि परत संडासाकरीता जाण्याकरीता गल्ल्ीची जागा ४३३८ मधून स्वमालकीची ठेवून बाकी उर्वरीत १८ X २० टिनाचे झोपडे किरायाने दिले हा दुरुस्ती अभिलेखाद्वारे ७१४ स्के. फुट भुखंड ४३३७ चे क्षेत्र ७१४ फुट आहे.

**प्रश्न ५ वा** :- प्लॅाट क्रमांक ४८५ हयाचे क्षेत्रफळ ५५X२३ असे होते घर बांधतेवेळी अंगणाकरीता पश्चिमेकडे १५ फुटाची जागा होती नगर परिषदेची बोळ अंगणातूनच आहे.

**प्रश्न ६ वा** :- भुखंड ४३३६ प्लॉट ४८५  ५५ x २३ =१२६५ स्के. फुट होते सदरची जागा कोणी केव्हा घेती त्या बाबतचे कुठलीही पुसटशी कल्पना आम्हाला नाही करीता पूर्ण माहिती त्या अधिका-याच्या शेरा टिपणासह देणे.

**प्रश्न ७ वा** :- मृत वेणूबाई रामाजी ढोले प्लॉट क्रं. ४८५ भाडेपटटी वारीस लिलाधर रामाजी ढोले सर्वच स्टँप लेखाद्वारे जवळील रेकार्डनुसार गत ४० वर्षापासून भूमापन कार्यालय अधिकारी कर्मचारी यांचे चुकीमूळे या प्लॉटचे भाग पाडले आहे. माझे वयाचे १० वर्षापासून सतत वाद सुरु आहे. वेणूबाईना माझ्या व्यतिरिक्त कोणीही वारसाला नव्हते. २) सदर प्लॉटची विक्री बक्षीस आईने करुन दिली नाही. ३) आज माझे वारस आईचे नसताना धंद्यासाठी जागेची आवश्यकता आहे. ४) वारंवार गुंडप्रवृत्तीचे, समाजकंटकाशी वाद टाळणे कोणताही अनुचीत प्रकार घडु नये या सर्व बबी लक्षात घेवून ७.१०.२००४ पासून सतत पैसे भरणे आज पावेतो वारंवार माहिती मागीत आहे. परंतु आपण मुळापर्यंत जावून त्याची माहिती दिली नाही.

**प्रश्न ८ वा** :- सदरच्या प्लॉटमध्ये वेळोवळी झालेल्या फेरबदलाची सर्व कागदपत्रे त्यांचे लेख अधिका-याचे टिपण शेरा नकाशे बंदोबस्ताच्या कॅापी माहिती अधिकारान्वये देण्यात यावी.

सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २५.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १८.११.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, वर्धा यांना ७ दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे आदेश असून सदरच्या आदेशाची प्रत ही अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. सदरच्या आदेशाप्रमाणे दिनांक २८.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या माहिती मुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २८.७.२०६ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात.

३. त्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती माहिती अपूर्ण असल्यामुळे पून्हा माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. मात्र आयोगाची नोटीस गेल्या नंतर माहिती अधिकारी यांनी दिनांक ७.२.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. याचा अर्थ माहिती उपलब्ध होती परंतु विहित मुदतीत माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी सुध्दा त्यांच्या माहितीच्या अर्जाचे जोडपत्रामध्ये जी माहिती मागीतली आहे, ती माहिती ही अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे अपेक्षित नाही. मात्र मुख्य अर्जामध्ये जी माहिती मागीतली आहे ती अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित असल्यामुळे ती विहित मुदतीत उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होते.

५. अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांनी मागीतलेल्या भूखंडाच्या संबंधामध्ये जे फेर फार झालेले आहे त्या फेरफाराच्या संबंधामध्ये कार्यवाही करण्याचे सुध्दा अपेक्षित केलेले आहे. मात्र झालेल्या निर्णयाचे संबंधामध्ये गुणवत्तेच्या नुसार कोणत्याही प्रकारची कार्यवाहीचे आदेश देणे राज्य माहिती आयोगाचे अधिकार कक्षेत येत नाही. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे त्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता यांनी योग्य त्या संबंधीत अधिका-याकडे तक्रार दाखल करुन त्यांच्या तक्रारीचे निराकरण करुन घेणे संयुक्तिक राहील.

६. जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे माहिती विहित मुदतीत कां उपलब्ध करुन दिली नाही याबध्दल शास्ती लादण्याच्या बध्दल त्यांचे म्हणणे काय आहे हे विचारले असता त्यांचे असे म्हणणे आहे की, सदरची माहिती ही १९९३ ची असल्यामुळे शोध घेण्यासाठी विलंब झाला व त्यामुळे माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु ३० दिवसांचे मुदतीत मात्र कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार हा अर्जदाराशी करण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर मात्र प्रथम अपीलीय अधिकारी किंवा आयोगाची नोटीस गेल्या नंतर मात्र संपुर्ण नस्ती मिळून आली व माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. याचा अर्थ विहित मुदतीत माहिती देण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत. व त्यामुळे जन

माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे शास्तीस पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांची विभागीय चौकशी करण्याची शिफारस करण्यात येत आहे. सदरची विभागीय चौकशी ही उप संचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांनी करावयाची असून त्याबध्दलचा अहवाल ३ महिन्यांचे आंत आयोगास सादर करावा.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत उप संचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १६.२.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०८२/२००७**

**१) श्री नारायण अंतू साखरे,**
**मु.चंद्रपूर टोली, वार्ड नं.९, गोरेगांव,**
**पो.ता. गोरेगांव, जिल्हा गोंदिया.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, गोरेगांव, ता.गोरेगांव, जि. गोंदिया.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**ग्राम विकास अधिकारी,**
**ग्राम पंचायत कार्यालय, गोरेगांव,**
**ता.गोरेगांव, जिल्हा गोंदिया.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २०.२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.७.२००६ रोजी "गट क्रमांक ३०९ आराजी १.२० हेक्टर आर, मौजा गोरेगांव येथील अतिक्रमणाची माहिती सादर करणे. सन १९८१ ते आजपर्यंत. सरपंच, सचिव यांनी अतिक्रमण काढले कसे? याची संपूर्ण माहिती. माहिती व्यक्तीशः उपस्थित राहून घेणार" असे नमूद केले आहे. सदरच्या माहितीचे संदर्भामध्ये दिनांक २५.८.२००६ रोजी रुपये २६/- हे नक्कल फी म्हणून अपीलकर्ता यांनी भरलेले दिसून येते. व त्या संदर्भात दिनांक २.८.२००६ अशी तारीख असलेले पत्र दिनांक २५.८.२००६ रोजी अपीलकर्ता यांना प्राप्त

झाल्याची पोच दिसून येते. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने, "मौजा गोरेगांव येथील चंद्रपूर टोली गट क्रमांक ३०९ या सार्वजनिक जागेवर अतिक्रमण केल्याबाबत स्थानिक रहिवाशांनी ग्राम पंचायत गोरेगांवला लेखी व तोंडी तक्रार केल्यामुळे सदर सार्वजनिक जागेवर अतिक्रमण होऊ नये यासाठी ग्राम पंचायतीने ठराव क्रमांक ६/१ दिनांक २२.९.२००५ नुसार निर्णय घेऊन दिनांक २२.९.२००५ ला पोलीस मदत घेवून पंचनामा करुन सदर जागेवरील अतिक्रमण काढण्यात आलेले आहे. अतिक्रमण करुन बांधकामाला सुरुवात केल्यामुळे आपणास बांधकाम थांबविण्यासाठी ग्राम पंचायतीने रितसर नोटीस बजावलेली होती. सदर जागा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अतिशय महत्वाची असल्याने ग्राम पंचायतीचे मार्फत रितसर कार्यवाही करुन अतिक्रमण काढण्यात आलेले आहे. सदर जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी काटेरी कुंपन करण्यात आलेले आहे. आपण केलेल्या अर्जाप्रमाणे वरीलप्रमाणे माहिती देण्यात येत आहे." सोबत संपुर्ण प्रकरणातील सहपत्रे यांच्या सत्यप्रती एकुण १० देण्यात आलेल्या दिसून येत आहे.

३. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२००६ रोजी गट विकास अधिकारी (उ.श्रे.), पंचायत समिती, गोरेगांव यांचेकडे, माहिती बरोबर नाही ; खोटी आहे, असे नमूद करुन प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदर प्रथम अपीलाच्या सुनावणी करीता वेळोवेळी अपीलकर्ता यांना उपस्थित राहाण्याकरीता पत्र देण्यात आल्याचे दिसून येते. त्या संदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांनी सुध्दा दिनांक २८.११.२००६ रोजी पत्राने असे कळविलेले दिसून येते की, सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी ही ४५ दिवसांत झालेली दिसून येत नाही. व त्यामुळे आपण जर या तारखे नंतर दूसरी निश्चित कोणतीही तारीख द्यावी व तुम्हाला काय निर्णय द्यावयाचा आहे तो द्यावा व लेखी निर्णय द्यावा जेणेकरुन आम्हाला पुढचे अपील करण्याकरीता योग्य संधी लाभेल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक ७.१२.२००६ रोजी सदरच्या प्रथम अपीलाची चौकशी लावण्यात आलेले दिसून येते. व दिनांक ३/१/२००७ ला सदरचे अपील हे फेटाळले आहे असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी दिनांक २.७.२००७ रोजी श्री व्ही.एन. मडावी, गट विकास अधिकारी यांचेकडे नुकसान भरपाई करीता अर्ज दाखल केल्याचे दिसून येते व त्या अर्जामध्ये माझ्या अतिक्रमणाची केस तहसिलदार गोरेगांवच्या विचाराधिन आहे. मला या अपीलाच्या अनुषंगाने योग्य लेखी निर्णय द्यावा व नुकसान भरपाई मिळवून द्यावी असे लेखी दिल्याचे दिसून येते. व त्यानुषंगाने अपीलकर्त्यांची आयोगाकडील नुकसान भरपाईची मागणी किंवा अतिक्रमणाच्या संबंधात मागणी ही आयोगाच्या अधिकार कक्षेच्या बाहेर आहे. व शासकिय जमीनीवरील अतिक्रमणाच्या संबंधात तहसिलदार यांना अधिकार असल्यामुळे अपीलकर्ता यांनी तहसिलदार यांचेकडून न्याय मिळवून घेणे संयुक्तिक राहील.

५. वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या अर्जास विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलसुध्दा विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे फेटाळण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील सुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

४) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २७.७.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

५) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.२.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०८६/२००७**

**१) श्री उत्तम कुमार कामिनकर,**
**रा.३८, शिवाजी नगर, पो. सुपेला, भिलाई,**
**त.जिल्हा दुर्ग (छत्तीसगड)**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपवन संरक्षक, वनविभाग कार्यालय,**
**अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक वन संरक्षक, वनविभाग कार्यालय,**
**अमरावती.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २०.२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२००७ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

"(१) गायत्री सॉमिल, नेहरु टिम्बर मार्केट (हमालपूरा) आरामशीनच्या लाईसन्स धा-याचे, नांव

(२) हया सॅामिलचे नामांतरण संजय सॅामिल केव्हा ठेवण्यात आले आणि त्याबध्दल हया नामांतरणाला कोणत्या अधिका-याने सम्मति दिली त्याचा तपशिल आणि त्याबध्दल कार्यालय टीप

(३) हे नामांतरण कसे काय झाले आणि त्या बध्दल दिनांक १८.९.२००३ मध्ये श्री पुंडलीकराव कामिनकर हयांनी दिलेल्या पत्रावर काय कार्यवाही करण्यात आली आणि त्याबध्दल कार्यालयाची टिपणे आणि निर्णय त्या बध्दल टिप्पणेची सत्यप्रति

(४) लाइसेंस नामांतरण बाबत ज्या प्रक्रियेचे पालन करण्यात येते त्या बध्दल पण माहिती देण्याची कृपा करावी. "

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.४.२००७ रोजी विभागीय कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती या कार्यालयात तयार आहे. आपण अर्जाला रुपये १० चा कोर्ट फी स्टॅाम्प लावलेला नाही. त्याकरीता रुपये १०/- व आपण मागीतलेली माहिती, १४ प्रती असून रुपये २ प्रती प्रमाणे रुपये २८/- तसेच आपणाला माहिती कशी पाठवावी, याबाबत आपल्या अर्जात उल्लेख केलेला नाही. परंतु, लिफापा रजिस्टर असल्यामुळे माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविण्याकरीता रुपये ३५/- असे एकुण रुपये ७३/- च्या चालनची प्रत सोबत जोडण्यात यात आहे. सदर चलनाचा भरणा राष्ट्रीयकृत बँकेत करावा व भरणा केलेल्या चलनाची प्रत कार्यालयास पाठवावी. जेणेकरुन भरणा केलेल्या चलनाची प्रत प्राप्त होताच आपण मागणी केलेल्या दस्तऐवजाच्या प्रती रजिस्टर पोस्टाने आपणास पाठविण्यात येईल, असे कळविल्याचे दिसून येते.

४. त्यानंतर दिनांक १६.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी पुन्हा एक पत्र दिलेले दिसून येते. त्यात रुपये १० ची पोस्टल ऑर्डर पाठविलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक २५.४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यानी पुन्हा रुपये ७३/- च्या संदर्भामध्ये व १०/- रुपयाची पोस्टल ऑर्डर स्विकारता येत नाही याबध्दल कळविण्यात आल्याचे दिसून येते. त्यानंतर दिनांक ३.५.२००७ रोजी रुपये ७३/- राष्ट्रीयकृत बँकेत भरले व भरणा केलेल्या चलनाची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे. माहिती उपलब्ध करुन द्यावी असे अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांना पत्र दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ३.५.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेले दिसून येते. त्याबध्दलची नोंद वहीमध्ये क्रमांक ४७ वर अर्जदाराचे नांव दिसून येत आहे. त्यानंतर पुन्हा अर्जदाराने दिनांक २१.५.२००७ रोजी रुपये ७३/- च्या भरलेल्या चलनाची छायांकित प्रत व दिनांक १०.३.२००७ चे अर्जाची प्रत पाठविलेली दिसून येते. त्यामुळे दिनांक १.६.२००७ रोजी पुन्हा दिनांक ३.५.२००७ रोजी प्रत्यक्ष माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तीच माहिती

परत पाठविण्याचा प्रश्न उदभवत नाही, असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ११.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी केवळ छायांकित प्रत देवून मी मागीतलेल्या माहितीचे उत्तर मिळाले नाही, त्यामुळे आपण हेतु पुरस्पर पत्राच्या माहितीचे उत्तर देण्याचे टाळत आहे. ते उत्तर देण्याचे कष्ट घ्यावे वगैरे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक २२.६.२००७ रोजी माहितीच्या दिनांक ३.५.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आल्याचे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.७.२००७ रोजी प्रथम अपील, प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप वन संरक्षक यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २७.७.२००७ रोजी झालेल्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देवून पुन्हा प्रथम अपीलावर शासनाने अधिनियमात ठरवून दिलेले किंमतीचे कोर्ट फी स्टॅाम्प सोबत लावलले नाही, त्यामुळे आपल्या अपीलाचा विचार करता येणे शक्य नाही. आपणास माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर माहिती हवी असल्यास पुन्हा शासनाने विहित केलेल्या कोर्ट फी स्टॅाम्प सह माहिती अधिकारी यांचेकडे नव्याने अर्ज सादर करावा, असे कळविलेले दिसून येते. व सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता अर्जास किंवा अपीलास स्टँम्प सुध्दा न लावता अर्ज करतो. त्याबध्दल माहिती दिल्यावरही पुन्हा पुन्हा तीच चूक करतो याचा अर्थ अपीलकर्ता हा त्रास देण्याचे उद्येशाने जाणिवपूर्वक अर्ज, अपील वगैरे करताना स्टँम्प लावत नाही असा निष्कर्ष काढावयांस हरकत नाही. द्वितीय अपील मेमो मध्ये कोणत्या प्रकारची माहिती त्यांना मिळालेली नाही याबध्दल कोणत्याही प्रकारचा खुलासा तपशिलात केलेला नाही. माहिती उपलब्ध झालेली असून सुध्दा माहिती देण्याचे टाळाटाळ होत आहे असे नमूद केल्याचे दिसून येते. माहिती देण्याबध्दल टाळाटाळ होत आहे, या पलीकडे कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण केलेले नाही.

६. अपीलकर्ता यांना दिनांक ३.५.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांना परवाना (लायसन्स) कोणाच्या नांवे कशा प्रकारे बदल झाला आहे त्या आदेशाची प्रत देण्यात आली आहे. व त्यावरुन आरामशीन लायसन्स धा-यांचे नांव हे स्पष्ट दिसत असले तरी अपीलकर्ता यांना लायसन्स व परवाना हे एकच आहे असे

कळलेले असून सुध्दा कळलेले नाही असे दाखवून माहिती अपूर्ण दिली असे, त्यांचे म्हणणे आहे. त्यानंतर पुन्हा स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

७. मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये गायत्री सॉ मिल नामांतरण संजय सॉ मिल केव्हा ठेवण्यात आले आणि त्याबध्दल या नामांतराला कोणत्या अधिका-याने संमती दिली त्याचा तपशिल हा स्पष्टपणे दिलेला नसला तरी त्याबाबतचा पत्रव्यवहार दिसून येतो. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना संजय सा मिल हे नांव केव्हा ठेवण्यात आले या बध्दलचे स्पष्ट उत्तर उपलब्ध असल्यास देणे संयुक्तिक राहील.

८. मुद्या क्रमांक ४ मध्ये लायसन्स नामांतरणा बाबत ज्या प्रक्रियेचे पालन करण्यात येते त्याबध्दल आपण माहिती देण्याची कृपा करावी असे म्हटलेले आहे व त्याबाबत लायसन्स (परवाना) देण्याच्या संबंधामध्ये जे शासनाचे नियम असतील किंवा सूचना असतील त्याबध्दलचे परिपत्रकाची छायांकित प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक २ गायत्री ते संजय सॉ मिल या नामांतरणाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध असल्यास व मुद्या क्रमांक ४ प्रमाणे लायसन्स (परवाना) नामांतरणाच्या बाबत ज्या प्रक्रियेचे पालन करण्यात येते त्याबध्दल कायद्याच्या तरतूदी, शासनाचे नियम किंवा सूचना इत्यादिच्या प्रती उपलब्ध असल्यास त्याच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत वर म्हटल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२. निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २०.२.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०८५/२००७**

**१) सौ. निर्मला भाऊराव नगरकर,**
**रा.वडगांव पोलीस चौकी जवळ, पेट्रोल पंपासमोर,**
**नागपूर रोड, वडगांव वार्ड, पो.ता.जि. चंद्रपूर.**

**अपीलकर्ती**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**तहसिलदार, पोंभूर्णा, ता. पोंभुर्णा,**
**जिल्हा चंद्रपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**तलाठी, घोसरी, ता. पोंभुर्णा,**
**जिल्हा चंद्रपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २०.२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती हिने दिनांक २८.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ती विना अनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १८.१२.२००६ रोजी माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी तथा तलाठी, घोसरी यांचेकडे व माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, पोंभुर्णा यांचेकडे दिनांक १५.१.२००७ रोजी अनुक्रमे माहितीचा अर्ज व प्रथम अपील दाखल करण्यात आल्याचे दिसून येतात. परंतु, माहिती अधिकारी तथा तलाठी, घोसरी व प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, पोंभुर्णा यांच्या खुलाशाप्रमाणे दोनही कार्यालयामध्ये माहितीचा अर्ज तसेच प्रथम अपील हे प्राप्त झालेले नाहीत. त्याकरीता तलाठी, घोसरी व तहसिलदार, पोंभुर्णा यांचे कार्यालयातील आवक नोंद वही अवलोकन करणे आवश्यक

आहे. व त्याचप्रमाणे तलाठी, घोसरी व तहसिलदार, पोंभुर्णा यांनी सुध्दा त्यांचे कार्यालयात दोनही अर्जांचा शोध घेऊन त्याकरीता ॲफिडेव्हीट करण्याचे आदेश देण्यात येत आहे.

३. सदरच्या अपीलाच्या संदर्भात सुनावणीची पुढील तारीख ३.५.२००८ व वेळ सकाळी १०.३० वाजता देण्यात येत आहे. त्या दिवशी आवक नोंदवही व ॲफिडेव्हीट हे दाखल करण्यात यावे.

**नागपूर**
**दिनांक २०.२.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १००३/२००७**

**१) श्री मोहम्मद लक्कडशा**
**रा. एबी मुस्तफा डेकोर, कस्तुरबा रोड,**
**चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर -४४२४०२.**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**निबंधक, भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**नवीन प्रशासकिय इमारत, ६ वा मजला, शासकिय वसाहत,**
**बांद्रे (पूर्व ) मुंबई- ४०००५१.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक, भागीदारी संस्था, नागपूर**
**जूने सचिवालय, सिव्हील लाईन्स, नागपूर.**

.

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २१.२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, भागीदारी संस्था हे हजर असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे व खुलासा दाखल केलेला आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२००६ रोजी कार्यालयास प्राप्त दिनांक २०.६.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते.

Description of the information required -

१. Number and list of applications received for registration wherein business of firm is Real estate development.

२. Number and lis of registrations done for above applications and pending applications.

३. Reason for pendency of above applications and copy of last communication received from applicants for documents asked or query raised.

४. The copy of documents and licenses on record for the application where registration has been done.

५. Citizen charter as regards registration of firms.

६. Departmental instruction as regards for documents and government licenses for registration of new firms viz-a-viz requirement as per Indian partnership Act, १९३२.

७. Name, designation and detailed address of immediate higher authority of Public Information Officer and organizational structure of Registrar of firms, Maharashtra.

८. Name, designation and detailed address of appellate authority for filling the first appeal in case of denial of above information.

सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केलेले असून माहितीचा कालावधी हा दिनांक १.४.२००५ ते १५.६.२००६ दिसतून येतो.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३०.६.२००६ रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत "आपण मागीतलेली माहिती ही कार्यालयाच्या पध्दतीनुसार उपलब्ध नोंद वहिमध्ये आपण मागीतलेली माहिती व्हाल्युमिनिअस माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. तथापि, काही प्रकरणामध्ये नमूने व भागीदारी पत्रे परत पाठविलेले आहेत,. ते परत येईपर्यंत त्याची माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. या कार्यालयात या कामासाठी केवळ एक लिपिक उपलब्ध आहे. त्यामुळे दैनंदिन कामे सोडून या कामाकरीता स्वतंत्र वेळ देता येणार नाही.

त्यामुळे माहिती उपलब्धता कठीण बाब आहे. " असे माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते.

४. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा निबंधक, भागीदारी संस्था यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ८.८.२००६ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांचे प्रथम अपील अंशतः मंजूर करण्यात येवून अपीलकर्त्यांच्या अर्जातील क्रमांक ६ व क्रमांक ७ च्या संबंधामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले दिसून येतात.

५. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक ३१.८.२००६ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याचे शुल्क रुपये १६/- इतके भरावे असे कळण्यित आले. अपीलकर्ता यांनी रुपये १६ न भरता दिनांक २१.९.२००६ च्या पत्रान्वये संबंधीत कागदपत्राचे निरीक्षण घेण्याची परवानगी मागीतली. दिनांक १६.१०.२००६ च्या कार्यालयाच्या पत्राअन्वये अर्जदारास दिनांक ३१.१०.२००६ रोजी ठीक ३.०० वाजता कार्यालयात निरीक्षणा करीता उपस्थित राहाण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार अर्जदारास दिनांक ३१.१०.२००६ रोजी विना मुल्य निरीक्षण देण्यात आले. त्यांच्या खुलासा दाखल केल्याप्रमाणे श्री मोहंमद लक्कडशा, सी.ए. यांचा दिनांक १६.८.२००६ रोजी या कार्यालयात दुसरा अर्ज दाखल झाला. त्यानुसार -

अ) दिनांक १.४.२००६ ते १०.८.२००६ या कालावधीत नोंदणी करीता प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या तसेच दिनांक १.८.२००६ ते १०.८.२००६ या कालावधीत दिवसावार दाखल झालेल्या अर्जांची संख्या.

ब) दिनांक १.४.२००६ ते १०.८.२००६ या कालावधीत एकुण नोंदणी झालेल्या भागीदारी संस्था तसेच दिनांक १.८.२००६ ते १०.८.२००६ या कालावधीत दिवसावार नोंदणी प्रमाणपत्र दिलेल्या एकुण संस्थेचे संख्या

क) तसेच दिनांक १४.११.२००५ पावती क्रमांक ६४८४ (नोंदणी शुल्क) तर्फे मुस्तफा असोसिएट, चंद्रपूर यांनी दिलेल्या निवेदनाबाबतची सद्यस्थितीतील माहिती तसेच संस्थेची

नोंदणी न झाल्याबाबतची कारणे व शेवटच्या पत्रव्यवहाराबाबतची प्रत या बाबतची माहितीची मागणी केली.

६. त्याप्रमाणे दिनांक ३१.८.२००६ रोजीच्या या कार्यालयाच्या पत्रान्वये अर्जदारास दिनांक १५.९.२००६ रोजी व्यक्तीशः उपस्थित झाल्यास सदर माहिती पुरविण्यात येईल याबाबत कळविण्यात आले. परंतु, सदरची माहिती मिळविण्याकरीता अर्जदार स्वतः हजर न होता अर्जदाराने श्री दिपक उदेशी यांना दिनांक १४.९.२००६ रोजी प्राधिकार पत्र देऊन माहिती त्यांना पुरविण्यात यावी असे कळविले. त्यानुसार सदर माहिती दिनांक १५.९.२००६ रोजीच्या कार्यालयाच्या पत्रानुसार श्री दिपक उदेशी यांना व्यक्तीशः पुरविण्यात आली.

७. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२००६ च्या अर्जाच्या अन्वये मिळालेल्या माहितीच्या आधारावरच राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील मेमो मध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०.६.२००६ रोजी दिलेल्या उत्तरात विसंगती दाखवून देण्याचा प्रयत्न करुन उत्तर चुकीचे दिलेले आहे. दिशाभूल करणारे दिलेले आहे, असे म्हटलेले आहे. व प्रथम अपीलामध्ये सुध्दा या बाबीचा विचार केलेलो नाही असे त्यांनी सांगीतलेले आहे. परंतु, प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीच्या संबंधामध्ये प्रत्येक मुद्याचे विश्लेषण केलेले असून मुद्या क्रमांक १ ते ५ ची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो.

८. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमो मध्ये उपलब्ध झालेल्या माहिती मध्ये जे नमूद केलेले आहे त्यावरुन सुध्दा असे दिसून येते की, कार्यालयाकडे जे अर्ज आलेली दिसून येतात ती अर्ज ८०० च्या जवळ पास दिनांक १.४.०६ ते १०.८.२००६ या कालावधीतील दिसून येतात. व अपीलकर्ता यांनी मागीतलेल्या माहितीचा कालावधी हा दिनांक १.४.२००५ ते १५.६.२००६ हा असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य दिसून येते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा दिलेला निर्णय हा योग्य दिसून येतो. व त्यानंतर अपीलकर्ता

यांनी निरीक्षण केलेले असल्यामुळे व त्यांनी निरक्षणामध्ये माहिती उपलब्ध करुन घेतलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व निरीक्षणाची संधी दिलेली असल्यामुळे व निरीक्षणाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध करुन दिैली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.२.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १००७/२००७**

**१) श्री बबन दुर्गाजी अडेकर**
**रा.हिन्द नगर राष्ट्रभाषा प्रचार समिती मागे,**
**वर्धा. ता.जि. वर्धा**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ,**
**नागपूर.**
**३) जन माहिती अधिकारी तथा**
**जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,**
**वर्धा. ता.जिल्हा वर्धा.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २१.२.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हे ७५ टक्के शारिरिक अपंगत्व असल्यामुळे व प्रवास करणे त्रासदायक असल्यामुळे दिनांक १८.२.२००८ रोजी सुनावणीला प्रत्यक्ष हजर न राहाण्याबध्दल सुट मिळावी अशी विनंती करुन त्यांनी अपीलाच्या संदर्भामध्ये स्पष्टीकरण दिलेले दिसून येते. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००६ रोजी डॅा. अशोक गुंडावार, कार्यालय प्रमुख, जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे, रजा प्रवास सवलत सन २००५-०८ बुध्दीपुरस्पर मंजूर न करता कर्मचा-यांस आर्थिक लाभापासून वंचित ठेवणे, या कारणास्तव आर्थिक वर्ष सन २००१-२००४ रजा प्रवास सवलत बध्दल केलेली माहिती विशिष्ट तक्यामध्ये मागीतलेली दिसून येते. त्यामध्ये त्या कालावधीतील सर्व कर्मचा-यांच्या संबंधात रजा प्रवास सवलतीच्या संबंधात पुरावा वगैरेची माहिती मागीतलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २३.६.२००६ रोजी सामान्य रुग्णालाय, वर्धा येथील माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची नेमणुक करुन त्यांच्या नांवाचा फलक जनतेच्या माहितीसाठी बाहय रुग्ण विभागात लावलेला आहे. आपणास हवी असलेल्या माहिती करीता रुग्णालयाच्या माहिती अधिका-याकडे अर्ज सादर करावा. परंतु, अपीलकर्ता यांनी डॉ. व्ही.डी. खानंदे, उप संचालक, आरोगय सेवा, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपील मेमो मध्ये सार्वजनिक प्राधिकरण (संस्था प्रमुख) यांनी त्यांचे सोयीनुसार जन माहिती अधिकारी पदनिर्देशित करणे अंतर्गत बाब आहे, याचा माहितीची विनंती करणा-या नागरिकांशी संबंध नाही. व माहिती देण्याची पूर्ण जबाबदारी सार्वजनिक प्राधिकरण (संस्था प्रमुख ) यांची आहे, असे नमूद केलेले दिसून येते. व त्यामुळे प्रथम अपील दाखल केले आहे.

४. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १९.८.२००६ रोजी रजा प्रवास सवलत २००५-०८ बुध्दीपुरस्पर मंजूर न करता कर्मचा-यांस आर्थिक लाभापासून वंचित ठेवणे या संबंधातील अपील दिनांक ७.७.२००६ च्या संबंधात जिल्हा शल्य चिकित्सक, वर्धा यांना आपणास हव्या असलेल्या माहितीच्या मागणीसाठी राज्य जन माहिती अधिकारी यांना संबोधून लिहिलेल्या पत्राचे अनुषंगाने त्यांचे पत्र क्रमांक :सारुव/माहितीचा अधिकार/६८३९/०६, दिनांक १९/२३ जून, २००६ अन्वये माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या नांवाचा फलक जनतेच्या माहिती करीता बाहय रुग्ण विभागात लावलेला आहे. त्याचप्रमाणे त्यांना हव्या असलेल्या माहिती करीता त्यांनी माहिती अधिकारी यांचेकडे रितसर अर्ज करावा असे आपणास कळविण्यात आले असल्याची वस्तुस्थिती त्या कार्यालयाने दिलेल्या खुलाशा नुसार निदर्शनास येते. तसेच आपणास माहिती हवी असल्यास बाहय रुग्ण विभागातून माहिती गोळा करण्याची बाब त्यामध्ये नमूद केल्याचे दिसत नाही. बाहय रुग्ण विभागामध्ये लावलेल्या सदर फलकामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपीलीय अधिकारी म्हणून डॉ. अशोक गुंडावार, जिल्हा शल्य चिकित्सक, वर्धा यांचा उल्लेख केलेला असल्याचे नमूद केल्याने यापूढे आपणास आवश्यक असलेली माहिती प्राप्त करण्याच्या संबंधात माहिती अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे रितसर अर्ज सादर करावा असे कळविण्यात आल्याचे दिसून येते. परंतु,

पुन्हा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे वर नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व द्वितीय अपील मेमोमधील प्रार्थने मध्ये सहाय्यक माहिती अधिकारी हे अपीलीय अधिकारी (कार्यालय प्रमुख) यांचे अधिनस्त कार्यरत असून स्वतंत्र पद नसल्यामुळे सहाय्यक माहिती अधिकारी व माहिती अधिकारी ही पदे कार्यालय प्रमुख अपीलीय अधिकारी यांचे सहसंचालक असल्यामुळे कार्यालय प्रमुख यांचे संगनमताने उत्तर देण्यात येते. तेव्हा आपणास विनंती करण्यात येते की, वर म्हटल्याप्रमाणे माहिती प्राप्त होण्याकरीता कार्यालय प्रमुख यांना माहिती पुरविण्यात यावी व अपीलीय अधिकारी, प्रथम विभागाचे खाते प्रमुख तसेच खाते प्रमुख यांना निदेर्शित करावे. कारण त्यांना कार्यालय प्रमुख यांचे विरुध्द प्रशासकिंय कार्यवाही करण्याचा अधिकार असल्यामुळे माहिती सत्वर मिळण्याबध्दल कार्यवाहीची अपेक्षा आहे. तसेच कलम २० प्रमाणे माहिती अधिकारी यांना शास्तीबध्दल कार्यवाही करण्याचा अधिकार प्रदान करण्यात यावा. तेव्हा संस्था प्रमुख, कार्यालय प्रमुख डॅा. अशोक गुंडावार, जिल्हा शल्य चिकित्सक, वर्धा यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना मागीवलेली माहिती मिळवून देण्याचे करावे. तसेच कलम २० चे पोटकलम (१) (२) अन्वये यथायोग्य शास्तीबध्दल कार्यवाही करण्याबध्दल विनंती करण्यात येत आहे, असे नमूद केलेले आहे.

५. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (१) प्रमाणे माहिती ही ३० दिवसांत उपलब्ध करुन द्यावयाची आहे. व त्यामुळेच अधिनियमाध्ये सार्वजनिक प्राधिकरणाची व्याख्या दिलेली आहे. व त्या सार्वजनिक प्राधिकरणामध्ये वेगवेगळया स्तरावर माहिती उपलब्ध असते तर ती माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने अधिनियमाचे कलम ५ प्रमाणे जन माहिती अधिका-यांना पद निर्देशित करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. व त्याप्रमाणे त्या त्या स्तरावर जन माहिती अधिकारी नियुक्त करण्याचे अधिकार हे त्या सर्वजनिक प्राधिकरणास दिलेले आहे. व त्याप्रमाणे त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणा मध्ये जन माहिती अधिकारी हे नियुक्त करण्यात आलेले आहे. माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिका-याची असल्यामुळे व ती माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नाही तर अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे जन माहिती अधिकारी हे शास्तीस जबाबदार असल्यामुळे अर्जदाराने अर्ज हा जन माहिती अधिकारी यांचेकडे केला पाहिजे.

अन्यथा कोणत्याही अधिका-यांकडे अर्ज केल्यास व विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यास अन्य अधिका-यास कलम २० प्रमाणे शस्तीस जबाबदार धरता येणार नाही. उलट पक्षी अर्जदारास माहिती उपलब्ध होण्याचे दृष्टीने ते अडचणीचे आहे. व त्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सक हे जरी कार्यालय प्रमुख असले तरी अपीलकर्ता यांना जे उत्तर दिनांक २३.६.२००६ रोजी देण्यात आलेले आहे त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी सामान्य रुग्णालयातील जन माहिती अधिकारी यांचेकडे पुन्हा अर्ज सादर करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावयास पाहिजे होती. परंतु, तसे न करता त्यांनी प्रथम अपील उपसंचालक, आरोग्य सेवा यांचेकडे केल्याचे दिसून येते. उप संचालक, आरोग्य सेवा यांनी पुन्हा दिनांक १९.८.२००६ रोजी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य असे उत्तर दिसून येते.

६. सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती केल्यानंतर त्याच सार्वजनिक प्राधिकरणाच्या स्तरावरच माहिती उपलब्ध व्हावी याकरीता त्याच सार्वजनिक प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकारी यांना कलम १९ (१) प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त करण्याच्या संबंधात सार्वजनिक प्राधिकरणाने आदेश काढावयाचे असतात. व त्याप्रमाणे उप संचालक, आरोग्य सेवा यांनी जिल्हा शल्य चिकित्सक हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्याचे अपीलकर्ता यांना कळविले हे योग्य आहे. व त्याकरीता पुन्हा अपीलकर्ता यांनी त्याही उत्तराचा विचार न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन त्यामध्ये जी विनंती केली आहे ती विनंती सदर अधिनियमाच्या तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करणे हे कोणत्याही अधिका-यांच्या मर्जीवर नाही. तसेच अर्जदाराने सुध्दा एखाद्या अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे माहिती मागावयाची ठरविल्यास त्याला सुध्दा अधिनियमाच्या सर्व तरतूदी लागू होत असतात. अपीलकर्ता अर्जदार यांना सुध्दा कोणत्याही प्रकारची स्वत:ची मर्जी नुसार अर्ज करता येणार नाही. कोणत्याही प्राधिकरणाला जे अधिकार दिलेले असतात ते अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे दिलेले असतात. माहितीचा अधिकार, २००५ च्या तरतूदीप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांना शास्तीचे अधिकार नाही. व तशा प्रकारे शास्तीचे अधिकार हे राज्य माहिती आयोगास प्रथम अपीलीय अधिकारी यांना प्रदान करता येणार नाहीत. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपीलातील कोणतीही मागणी ही मान्य करता

येण्यासारखी नाही. व अपीलकर्ता यांनी माहिती मिळण्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडेच माहिती मिळण्यासाठीचा अर्ज करावयास पाहिज होता असे वर नमूद केलेले असल्यामुळे, परंतु सदरच्या अपीलाचे संदर्भात सामान्य रुग्णालय, वर्धा यामधील माहिती अधिकारी हे आज पक्षकार नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश देता येत नाहीत व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील मेमोमधील विनंती मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २१.२.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर.**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १०८८/२००७**

**१) श्री सुरेंद्रकुमार बलरामजी मोहबे**
**रा.अभ्यंकर नगर, मुक्ताबाई शाळेजवळ,**
**तुमसर -४४१९१२.ता.तुमसर, जिल्हा भंडारा**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (नि.श्रे.)**
**तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, भंडारा,**
**ता.जिल्हा भंडारा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**दुय्यम निबंधक (श्रेणी १)**
**तहसिल कार्यालय, तुमसर, जिल्हा भंडारा.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २२.२.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६ जुलै, २००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१, तहसिल कार्यालय, तुमसर यांचेकडे सन १९९९-०५ पर्यंतच्या कालावधीत नगर परिषद तुमसर द्वारे मंजूर करण्यात आलेल्या रजिस्ट्रीमध्ये नोंदणीकरीता लावण्यात आलेले निवासी ले आऊट प्लॅनची प्रत्येक गट क्रमांक १ ची सत्यप्रत (प्रमाणित प्रत). सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते..

३. अर्जाच्या मागील पृष्ठावर श्री रा.दी. गोगरकर, दुय्यम निबंधक, श्रेणी -१, तहसिल कार्यालय, तुमसर यांना उद्येशून दिलेल्या पत्रामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये

दिनांक २९.३.२००७ च्या अर्जानुसार संदर्भ क्रमांक १ नुसार आपणास कारणे देवून मी माहिती अर्ज संपुष्टात आण्याबाबत विनंती केली होती. संदर्भ क्रमांक २ नुसार नोंदणी क्रमांक व दिनांक बाबतची माहिती पुरविण्याबाबत लिहिलेले होते. संदर्भ क्रमांक ३ नुसार कार्यवाही करण्यात येईल असे लिहिले होते. संदर्भ क्रमांक १ नुसार कारणे देवून मी आपणास माहिती अर्ज संपुष्टात आणण्यासाठी विनंती केली होती. परंतु मला तुमसर नगर परिषदेकडून उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूरी, दिशाभूल करणारी व बहुतेक माहिती लपविली गेलेली आहे. करीता मी आपणास आज तारखेला माहिती मिळण्याकरीता नवीन अर्ज सादर केला आहे. संदर्भ क्रमांक २ नुसार नोंदणी करीता व दिनांकाबाबतची माहिती पुरविण्याबाबत लिहिलेले होते. जर मला नोंदणी क्रमांक व दिनांकाची माहिती असती तर मी आपणास माहिती मिळण्याकरीता अर्ज कशाला दिला असता. यावरुन स्पष्ट होते की मी मागीतलेली माहिती दिशाभूल करुन, फक्त टाळाटाळ करीत आहे. तरी आपण आज दिनांक ३.५.२००७ च्या अर्जानुसार दिलेल्या विषया अंतर्गत मला हवी असलेली माहिती अविलंब पुरविण्यात यावी. शासन नियमानुसार आवश्यक ती फी शासन जमा करण्यास मी तयार आहे असे दिलेले दिसून येते. सदरचा अर्ज दिनांक ३.५.२००७ रोजी दुपारी १२.३० वाजता दिलेला दिसून येतो.

४. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३०.५.२००७ रोजी आपण संदर्भिय अर्जानुसार मागीतलेली माहिती तयार आहे. सदर माहिती बाबत दिनांक ११.१०.२००५ च्या अधिसूचने नुसार माहिती बध्दल फी ही कलम ७ च्या पोटकलम १ (१) (अ)(क) अन्वये संबंधीत विभागाद्वारे फी निश्चित करण्यात आली असली असेल तर तीच फी आकारण्याबध्दल तरतूद करण्यात आली आहे. आपणाद्वारे मागणी केलेली माहिती ही दस्तऐवजाचा भाग म्हणून जोडण्यांत आलेली आहे. सदर्हु, माहितीचे आपण अवलोकन करुन माहिती ी बाबत आपण सहमती दर्शविल्यास आपणांस आवश्यक ती माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येईल, असे कळविण्यात आल्याचे दिसून येते.

५. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२००७ रोजी दुपारी २.०० वाजता दुय्यम निबंधक, श्रेणी-१ यांचेकडे दिनांक ३०.५.२००७ च्या नुसार दिलेल्या पत्राचे

अनुषंगाने कलम ७ चे पोटकलम (३) चा खंड (क) नुसार फीचा तपशिल नमूद करणारी सूचना पाठविलेली नाही. तरीपण मी प्रत्यक्ष सायंकाळी ५.०० वाजता आपली भेट घेतली असता आपण फक्त २००२ ते २००५ या कालावधीतील गट नंबर ची माहितीची लिस्ट दाखविली होती. आपणाकडून निश्चित केलेली फी बाबत कोणतीही सूचना दिलेली नाही. आपल्या पत्रानुसार आपण कलम ७ चे पोटकलम (१) (अ) (क) अन्वये माहिती बध्दल फी बाबत दिशाभूल करुन फक्त टाळाटाळी करीत आहात. कारण माहिती देण्याचे आज तारखेला ३० दिवस पुर्ण होत आहे. तरी पण आपण दिनांक ३.५.२००७ च्या अर्जानुसार मागीतलेली माहिती अविलंब पुरविण्यात यावी.

६. त्यावर दिनांक १.६.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा दुय्यक निबंधक, तुमसर यांनी सन १९९९-०५ या कालावधीत नगर परिषद, तुमसर द्वारे मंजूर करण्यात आलेले व रजिस्ट्रीमध्ये लावण्यात आलेले निवासी ले आऊट प्लॅनची गट नंबर यादी खालीलप्रमाणे आहे व गट क्रमांक देण्यात आलेले आहेत. उपरोक्त उत्तराबाबत तुमसर नगर पदरषदेद्वारे मंजूर करण्यात आलेले व रजिस्ट्रीमध्ये लावण्यात आलेले निवासी ले आऊट प्लॅन हे नोंदणीकृत रजिस्ट्रीमध्ये दस्तऐवजाचा भाग म्हणून जोडण्यात आलेले आहे. हे सर्व रेकार्ड नगर परिषदेचे असून दस्तऐवजाचा भाग म्हणून जोडण्यात आल्याने याबाबतची माहिती त्या दस्तऐवजाचा भाग म्हणून समजण्यात येतो. दस्ताची प्रत बाबत प्रति पृष्ठ रुपये २०/- एवढी फी या विभागाने( नोंदणी व मुद्रांक विभाग) निश्चित केलेली आहे. उपरोक्त गट क्रमांक बाबत रजिस्ट्रीमध्ये नोंदणीकरीता लावण्यात आलेल्या ले आऊट प्लॅन असलेल्या दस्तऐवजाची संख्या २६ एकुण पाने ४०१ एवढी आहेत. या अनुषंगाने त्यास प्रति पृष्ठ रुपये २०/- प्रमाणे रुपये ८०२०/- फी होत आहे. सदर फी रोख रकमेच्या स्वरुपात चालानद्वारे, बँकेचा धनादेश, मनी ऑर्डर द्वारे आपण शासन जमा केल्यानंतर आपणास माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येईल, असे कळविण्यात आल्याचे दिसून येते.

७. त्यावर दिनांक ४.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी " परंतु दिनांक १.६.२००७ ला ३० दिवस पुर्ण होऊन कलम ७ चे पोटकलम (६) नुसार आपणांकडून कालमर्यादेचे पालन करण्यासास कसूर झालेला आहे. तरी मी मागीतलेली माहिती मला मोफत मिळावयास पाहिजे.

व ही बाब मी आपणास माझ्या संदर्भिय पत्र क्रमांक २ मध्ये हयाबाबतीत स्पष्ट उल्लेख केलेला होता. व माहिती अविलंब पुरविण्यांबाबत विनंती ही केलेली होती, वगैरे कळविल्याचे दिसून येते."

८. त्यावर दिनांक ६.६.२००७ रोजी दुय्यम निबंधक, तुमसर यांनी अपीलकर्त्यांच्या बरोबर झालेला पत्रव्यवहार व त्याबाबत घडलेला घटनाक्रम याची स्पष्ट कल्पना देणारे विवेचन पत्र दिलेले दिसून येते. " आपण दिनांक ३१.५.२००७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता या कार्यालयात आले असता याबाबत या विषयी प्रत्यक्ष माहिती सुध्दा सविस्तरपणे निवेदित करण्यात आले होते. तसेच फी बाबत असलेली तरतूद सुध्दा आपल्या निदर्शनास आणून दिली होती. तसेच माहितीसाठी फीचा शासकिय भरणा केल्यानंतर माहिती तात्काळ देण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. दिनांक १.६.२००७ रोजी आपण आपल्या वैयक्तिक कामासाठी बाहेरगांवी जात असल्या बाबतची तोंडी सूचना दिनांक ३१.५.२००७ च कार्यालय भेटीत दिली होती. दिनांक १.६.२००७ रोजी आपण आपल्या प्रतिनिधी मार्फत अर्ज सादर करुन अर्जातील परिच्छेद क्रमांक १ मध्ये फीची सूचना, परिच्छेद क्रमांक २ मध्ये सन २००२ ते २००५ कालावधीतील गट क्रमांकाची यादी, परिच्छेद क्रमांक ३ मध्ये फी बाबत दिशाभूल करणे, परिच्छेद क्रमांक ४ मध्ये ३० दिवसाच्या कालावधी बाबत आक्षेप दर्शविल्याचे आढळते. वास्तविक पाहाता या सर्व बाबत दिनांक ३१.५.२००७ रोजी कार्यालयात आपणांस प्रत्यक्षपणे सर्व बाबी सविस्तरपणे दाखवून, सांगण्यात सुध्दा आल्या होत्या. फी बाबत आपणास संबंधीत अधिसुचना बाबतची प्रत वाचण्यांकरीता दिली होती. फी बाबत प्रत्यक्ष सूचना दर्शविल्याने याबाबत दिशाभूल करुन टाळाटाळ करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तसेच तीस दिवसाचा कालावधी हा दिनांक १.६.२००७ पर्यंत होता. या कार्यालयाचे पत्र दिनांक १.६.२००७ नुसार आपल्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने गट नंबर, दस्त संख्या, पृष्ठये व त्यानुषंगाने आवश्यक ती फीबाबत सविस्तर लेखी पत्र आपणस दिले. आपले मुळ माहितीचा अर्जात अनुक्रमांक ४ अन्वये माहिती व्यक्तीश: हवी आहे असे नमूद केले होते. त्यानुषंगाने दिनांक १.६.२००७ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत आपली येण्याची वाट पाहाण्यात आली. ( याच दिवशी आपण एक लेखी पत्र आपल्या प्रतिनिधी मार्फत कार्यालयात सादर केले होते.) आपणास आवश्यक असलेली माहिती तात्काळ मिळण्याचे

दृष्टीने, तसेच सद्भावना हेतूने व आपण कार्यालयात उपस्थित न झाल्याने या कार्यालयाने सदर बाब कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयाचे शिपाईच्या हस्ते आपणाकडून आपर्ण अर्जात नमूद केलेल्या पत्यावर देण्यांच्या उद्येशाने पाठविले असता आपण ते पत्र घेण्यास नकार दिला. तसेच दूस-या दिवशी पत्र घेण्याबाबत म्हटले होते. पुनश्च एकदा माहिती आपणास मिळावी या सदभावनेने कार्यालयाचे शिपाई ऑपरेटरसह पत्र पाठविले असता आपण घरी नसल्याने, तसेच घरातील इतर सदस्यांनी पत्र घेण्यांत असमर्थतता दर्शविल्याने व त्यांनी आपणांस दूरध्वनी द्वारे करण्यांत आलेल्या संभाषणानुसार आपण जी वेळ सुचविली, त्या अनुषंगाने संबंधीत शिपायाने त्याबाबत पालन करुन आपणाकडे तीनदा पत्र पोहचविण्याचा प्रयत्न केला. शेवटी दिनांक २.६.२००७ रोजी सायंकाळी ७.०० वाजता आपल्याद्वारे पत्र स्विकारण्यात आले. या संपुर्ण कालावधीत कार्यालयाने सद्भावना हेतूने सहकार्याची भूमिका घेतली असे या कार्यालयाचे नम्र मत आहे. निश्चित केलेली फीचा भरणा विहित कालावधीच्या आंत झाला असता तर माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्यास हे कार्यालय बाध्य होते, असे या कार्यालयाचे नम्र मत आहे. कार्यालयाद्वारे आपलया अर्जाचे बाबत करण्यात आलेली कार्यवाही विहित कालावधीत असल्याने आपण या कार्यालयास दिलेले दिनांक ४.६.२००७ चे पत्रातील परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेल्या कलमाचा भंग झालेला नाही, असे या कार्यालयाचे नम्र मत आहे, असे कळविलेले दिसून येते."

९. यावरुन दिनांक ११.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सह जिल्हा निबंधक, वर्ग १ यांचेकडे दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २८.६.२००७ रोजी देण्यात आलेला असून उक्त अधिनियमाच्या तरतूदीखाली माहिती अधिकारी यांनी अर्ज स्विकारुन आपण दिनांक १.६.२००७ च्या पत्रान्वये नक्कल फी चा लागणार अपेक्षित खर्च कळविलेला असल्यामुळे विहित कालावधीत अर्ज निकाली काढला हे स्पष्ट होते. वरील कारणास्तव अपीलार्थीचे अपील हे उक्त अधिनियमाच्या कलम १९ (१) व नियम ५(१) अन्वये फेटाळण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो.

१०. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केल्याचे दिसून येते.

११. अपीलकर्ता यांनी त्यांचे दिनांक ३.५.२००७ चे अर्जामध्ये माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती घेण्याकरीता व्यक्तीशः माहिती अधिकारी यांचेकडे जाणे हे आवश्यक ठरते. परंतु, वर नमूद केलेल्या सर्व पत्रव्यवहाराचा विचार केल्यास असे दिसून येते की, अपीलकर्ता हे दिनांक ३०.५.२००७ पर्यंत माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता माहिती अधिकारी यांचेकडे गेलेले दिसून येत नाही. व तसे त्यांनी पुरावे सुध्दा सादर केलेले नाही. अर्जदाराने व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घेणार असे दिलेले असल्यास माहिती अधिकारी यांनी त्यांना पत्राने, पोस्टाने कळविणे अपेक्षित नाही. तरी सुध्दा दिनांक ३०.५.२००७ रोजी माहिती अधिकारी यांनी माहितीच्या संबंधामध्ये कळविलेले दिसून येते. त्यातही अपीलकर्ता हे पत्र मिळाल्या नंतर कार्यालयात स्वतः गेलेले दिसून येते. ही बाब त्यांनी सुध्दा मान्य केली आहे. त्यांना फीच्या संबंधात कल्पना दिली होती. परंतु पुन्हा जो पत्रव्यवहार झालेला आहे तो पत्रव्यवहार सुध्दा त्यांनी स्विकारण्यास विलंब लावल्याचे दिसून येते. केवळ प्रतिनिधीला कार्यालयात पाठवून स्वतः जाण्याचे टाळलेले दिसून येते. अपीलकर्ता हे ३० दिवसांच्या मुदतीकरीता अत्यंत आग्रही दिसतात परंतु माहिती अधिकारी यांनी त्यांच्याशी चर्चा करुन सुध्दा त्यांना कल्पना देवून सुध्दा त्यांचे पत्र देवुन माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी नसताना सुध्दा पत्र घेण्याचे टाळाटाळ केलेले दिसून येते. जेणेकरुन ३० दिवसांची मुदत संपेल व ती त्यांच्या दिनांक १.६.२००७ च्या पत्रावरुन स्पष्ट होते. मुदत संपली आहे व त्यांना मोफत माहिती मिळावी असे त्यांनी दिनांक ४.६.२००७ चे पत्रात नमूद केलेले दिसून येते.

१२. माहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक १.६.२००७ चे पत्र व दिनांक ६.६.२००७ च्या पत्रामध्ये जी वस्तुस्थिती विषद केली आहे व जी सद्भावना व्यक्त केली आहे, त्या सद्भावनेच्या नोंदी त्यांनी नोटशिटवर प्रत्येक दिवसाच्या संबंधामध्ये ज्या नोंदी केलेल्या आहे त्या नोंदी दाखल केल्या आहेत व त्या नोंदीवरुन असे दिसून येते की, माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याकरीता पुरेपूर प्रयत्न केलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी विलंब झाला, विलंब झाला असे करुन व सदरचे पत्र हे संध्याकाळी ७.०० च्या नंतर स्विकारुन फी भरण्याची टाळले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे टाळाटाळ केलेले आहे हा निष्कर्ष काढता

येत नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीला मध्ये प्रथम अपीलाचा निर्णय देताना विलंब झालेला आहे त्याबध्दलचे जे विवेचन केलेले आहे ते माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे त्यावरुन दिलेले असल्यामुळे प्रथम अपीलातील दिलेला निर्णय सुध्दा योग्य आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती हवी असल्यास त्यांनी माहिती अधिकारी यांनी कळविलेली फी भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी यांनी कळविलेली फी प्रमाणे खर्चाचा भरणा करुन अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील फेटाळण्यात येत आहे.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २२.२.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर.**